

गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com



* वर्ष ६५ वे * अंक ३०५ * नांदेड * मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

नांदेड जिल्ह्यातील १६ तालुके पाणीटंचाई क्षेत्र घोषित; विहिरी व बोअरवेल खोदकामावर निर्बंध

बोअरवेल रिग मशीनची १५ दिवसांत नोंदणी बंधनकारक; नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाईचा इशारा

नांदेड (प्रतिनिधी)– सन २०२६ च्या खरीप हंगामात झालेली पर्जन्याची मोठी तूट आणि जिल्ह्यातील भूजल पातळीत झालेली घट लक्षात घेऊन नांदेड जिल्ह्यातील सर्व १६ तालुके पाणीटंचाई क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर भूजल उपशावर निर्बंध घालण्यासह नवीन विहिरी व बोअरवेल खोदकामासाठी कडक नियम लागू करण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष राहुल कर्डिले यांनी यासंदर्भात महत्त्वपूर्ण आदेश जारी केले आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या २५ सप्टेंबर व १४ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार जिल्ह्यातील सर्व तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९ मधील तरतुदीनुसार जिल्ह्यातील सर्व १६ तालुक्यांतील ग्रामीण व नागरी क्षेत्रे पुढील एक वर्षासाठी किंवा पुढील आदेशापर्यंत 'पाणीटंचाई क्षेत्र' म्हणून घोषित करण्यात आली आहेत.

जिल्ह्यात शेती अथवा औद्योगिक वापरासाठी ६० मीटरपेक्षा अधिक खोल विहीर किंवा बोअरवेल खोदण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतापासून ५०० मीटरच्या परिघात कोणत्याही प्रयोजनासाठी नवीन विहीर अथवा बोअरवेल खोदता येणार नाही.

सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतापासून एक किलोमीटर अंतराच्या परिघातील किंवा प्रभाव क्षेत्रातील खासगी विहिरी व बोअरवेलमधून व्यावसायिक अथवा सिंचनासाठी अनिर्बंध भूजल उपसा करण्यावर तात्पुरते निर्बंध घालण्यात आले आहेत. आवश्यकतेनुसार सार्वजनिक पिण्याच्या पाण्यासाठी अशा विहिरींचे तात्पुरते अधिग्रहण करण्याचे अधिकार संबंधित उपविभागीय अधिकारी व तहसीलदारांना देण्यात आले आहेत.

जिल्हा प्राधिकरणाच्या सक्षम अधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय भूजलाची व्यावसायिक विक्री अथवा टँकरद्वारे अनिर्बंध वाहतूक करण्यास मनाई करण्यात आली आहे. या निर्णयामुळे



पिण्याच्या पाण्याचा अनधिकृत व्यावसायिक वापर आणि विक्री रोखण्यास मदत होणार आहे.

जिल्ह्यात कार्यरत असलेल्या सर्व बोअरवेल खोदकाम यंत्रसामग्रीच्या मालकांनी व चालकांनी संबंधित उपविभागीय दंडाधिकारी किंवा तहसीलदार यांच्याकडे १५ दिवसांच्या आत नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. प्रत्येक रिग मशीनवर जीपीएस यंत्रणा बसविणेही आवश्यक आहे. पूर्वपरवानगीशिवाय अनधिकृत बोअरवेल खोदकाम आढळल्यास संबंधित यंत्रसामग्री जप्त करण्याची कारवाई करण्यात येणार आहे.

आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी व पोलीस प्रशासनाला तपासणी, अनधिकृत खोदकामाची साधने जप्त करणे तसेच आवश्यकतेनुसार वीजपुरवठा खंडित करणे आणि कायदेशीर कारवाई करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

जिल्ह्यातील उपलब्ध भूजलसाठ्याचे संरक्षण करणे, सार्वजनिक पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देणे आणि संभाव्य पाणीटंचाईवर प्रभावी नियंत्रण ठेवणे हा या आदेशाचा मुख्य उद्देश आहे. नागरिक, शेतकरी, औद्योगिक आस्थापना, बोअरवेल व्यावसायिक आणि सर्व संबंधितांनी आदेशातील निर्बंधांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

रोहित पवारांनी 'मफलर मॅन' म्हणून देवेंद्र फडणवीसांचा फोटो दाखवला

दादांचा घातपात करणाऱ्यांना वाचवल्याचा आरोप
फडणवीसांचा अमित शाहांसमोर शब्द

मुंबई (प्रतिनिधी)– अजितदादांच्या अपघातामागे असलेल्या व्हीएसआर कंपनीच्या मालकाला वाचवण्याचा प्रयत्न महाराष्ट्रातील एक नेता करत असल्याचा आरोप रोहित पवार यांनी या आधी केला होता. त्याचं नाव आता रोहित पवारांनी जाहीर केलं. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच व्हीएसआर कंपनीच्या मालकाला वाचवण्याचा प्रयत्न केला असा आरोप रोहित पवार यांनी केला.

देवेंद्र फडणवीस हे व्ही के सिंहच्या जयपूरमध्ये झालेल्या कार्यक्रमामध्ये उपस्थित होते. त्यांनीच या कंपनीच्या मालकाला वाचवण्याचा प्रयत्न केला असल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला. यामध्ये जर चूक असेल तर सरकारने तपास करावा, असं आव्हानही रोहित पवार यांनी केलं.

व्ही. के. सिंह आणि व्हीएसआर कंपनीला वाचवणारे देवेंद्र फडणवीस हेच नेते आहेत असं आमचं ठाम मत आहे. ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत, यांच्याकडे सत्ता आहे, सीआयडी आहे. पंतप्रधान त्यांचं ऐकतात, सीबीआय त्यांचं ऐकू शकते. पण आतापर्यंत तपास का होत नाही? याचं मुख्य कारण म्हणजे आपले मुख्यमंत्री फडणवीस हे व्ही. के. सिंह याचे निकटवर्तीय आहेत, असं आमचं ठाम मत आहे.

अजित पवारांच्या अपघाताचा अहवाल लवकर समोर आला पाहिजे. लवकर अहवाल यावा यासाठी मी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना देखील विनंती केली. अजितदादांच्या अपघाताबाबत स्पष्टता यावी. कोणी दोषी आढळल्यास कठोर कारवाई करणार, असा शब्द राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे.

पुढील वर्षी भारतात होणार क्रिकेट वर्ल्डकप; ९ ऑक्टोबरपासून सुरूवात

मुंबई (प्रतिनिधी)– आयसीसी वनडे वर्ल्डकप स्पर्धा २०२७ मध्ये होणार आहे. ह्या स्पर्धा दि. ९ ऑक्टोबर २०२७ रोजीपासून सुरू होणार आहे.


वनडे वर्ल्डकप २०२७ स्पर्धेची वेळापत्रक जाहीर झालं असून अवघ्या काही महिन्यांचा अवधी शिल्लक आहे. यासाठी सहभागी असलेले सर्वच संघ जोरदार तयारी करत आहेत. दक्षिण अफ्रिकेतील वातावरणाचा अंदाज घेऊन वेगवान खेळपट्ट्यांवर जोरदार सराव सुरू आहे. असं असताना आयसीसीने क्रीडाप्रेमींना एक आनंदाची बातमी दिली आहे. आयसीसीने पुढच्या १२ स्पर्धांच्या तारखांची घोषणा केली आहे.

दुष्काळग्रस्तांना, शेतकऱ्यांना आणखी दोन हजारांची मदत मिळण्याची शक्यता

मुंबई (प्रतिनिधी)– दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यांवर पाच हजार रुपयांचा अग्रीम जमा झाल्यानंतर दोन हजार रुपयांचा दुसरा हप्ता जमा करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून दुसऱ्या हप्त्यातील मदत जमा होण्याची शक्यता आहे. ३०४ दुष्काळी तालुक्यांत आणखी १० तालुक्यांची भर पडणार आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीच्या मदत निकषांत वाढ झाल्यामुळे केंद्र सरकारला सुधारीत प्रस्ताव सादर करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

राज्यातील ३०४ दुष्काळी तालुक्यांतील सुमारे एक कोटी पात्र बाधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर दिवाळी पूर्वी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत जमा झाली आहे. राज्यात १ कोटी ७१ लाख शेतकरी आहेत, त्यापैकी शेतकरी ओळख क्रमांक काढलेल्या शेतकऱ्यांची संख्या १ कोटी ३१ लाख इतकी आहे.

अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला किंवा सभागृहातील दुष्काळी चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री त्या बाबत घोषणा करण्याची शक्यता आहे. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून दुसऱ्या हप्त्याचे वितरण सुरू होण्याची शक्यता आहे.





अ.क्र	लोहा-कंधार तालुक्यातील विविध विकास कामे	रक्कम	वेळ	कामाचे ठिकाण
1	मौ. अंतेश्वर ता.लोहा जि.नांदेड येथे गावातंर्गत सी.सी.रस्ता व बंदिस्तनाली बांधकाम करणे.	3.99 कोटी	स.9.00 वा.	अंतेश्वर ता.लोहा
2	मौ. भारसावडा ता.लोहा जि.नांदेड येथे गावातंर्गत सी.सी.रस्ता व बंदिस्तनाली बांधकाम करणे.	2.99 कोटी	स.10.00 वा.	भारसवाड ता.लोहा
3	मौ. पेनुर ता.लोहा जि.नांदेड येथे गावातंर्गत सी.सी.रस्ता व बंदिस्तनाली बांधकाम करणे.	4.99 कोटी	दु.12.00 वा.	पेनुर ता.लोहा
4	ता.कंधार येथे अहमदपूर-घोटाका-शिदगी-कुरुळा-कंधार-चारुळ-गडगा रस्ता रामा-५६ कि.मी.२१८/० ते २४०/०० सुधारणा करणे. (ए.यु. १०४ घोडज फटा ते कंधार ते चारुळ ते कौठा रामप्मा १६१ अ)	1.85 कोटी	दु.2.15 वा.	घोडज रोड मार्केट कमिटीजवळ,कंधार
5	ता.कंधार येथे फुलवळ-हिप्रस-जांब-जळकोट रामा-२५० १) कि.मी.०/०० ते २/३०० (ए.यु.१०४ ते उपजिल्हा रुग्णालय १० मी रुंद व उपजिल्हा रुग्णालय ते कंधार शहर चौपदरीकरण करणे. २) कि.मी.२/३०० ते ३/८०० महाराणा प्रताप चौक ते शिवाजी कॉलेज पर्यंत करणे.	4.00 कोटी	दु.2.30 वा.	महाराणा प्रताप चौक कंधार
6	ता.कंधार येथे पानभोसी-आंबेसांगवी रस्ता प्रजिमा-६३ १)कि.मी.०/६०० ते २/०० कंधार शहर ते गुलाबवाडी चौपदरीकरण सी.सी.रोड सह सुधारणा करणे. (महाराणा प्रताप चौक ते म.बसवेश्वर पुतळा) २)कि.मी.२/०० ते ८/०० दुपदरी करणासाठी सुधारणा करणे.	3.61 कोटी	दु.2.30 वा.	महाराणा प्रताप चौक कंधार
7	ता.कंधार येथे कंधार-पानभोसी-आंबेसांगवी ते प्रमा ०६ रस्ता प्रजिमा-६३ किमी २/७०० ते ७/०० (इमामवाडी ते पानभोसी) रस्त्याची पुलमोऱ्यासह रुंदीकरण करणे.	5.00 कोटी	दु.3.00 वा.	महात्मा बसवेश्वर पुतळा कंधार

लोहा-कंधार तालुक्यात 26.43 रुपयांच्या कामाचा भूमिपूजन सोहळा

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

उद्या अन्न कुठे पिकणार?

रस्ते रुंद होत आहेत, शहरे विस्तारत आहेत, कारखान्यांची धुराडी उभी राहत आहेत, सौरऊर्जा प्रकल्पांसाठी हजारो एकर जमीन शोधली जात आहे आणि धरणांसाठी शेतीचे भूभाग पाण्याखाली जात आहेत. विकासाच्या या घोडदौडीला विरोध करण्याचे कारण नाही. पण या घोडदौडीत आपण आपल्या ताटाखालची जमीनच ओढून घेत आहोत का? हा प्रश्न आता टाळता येणार नाही. देशातील जवळपास प्रत्येक जिल्ह्यात विविध महामार्ग, औद्योगिक प्रकल्प, सिंचन योजना आणि नव्या वसाहतींसाठी हजारो एकरांहून अधिक जमीन संपादित करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे चित्र आहे. त्यात शेतीयोग्य जमीन मोठ्या प्रमाणावर असेल, तर ही बाब केवळ जमीन संपादनाची नाही; ती भविष्यातील अन्नसुरक्षेची धोक्याची घंटा आहे. आज विकासासाठी घेतलेली जमीन उद्या पुन्हा शेतात आणता येणार नाही. काँक्रिट एकदा पसरले की नांगर पुन्हा फिरत नाही. शहरांचा विस्तार हा नियोजनाचा भाग असला तरी त्यासाठी सर्वप्रथम शहरालगतची सुपीक शेतीच का बळी जाते? काळी कसदार जमीन, पाण्याची उपलब्धता आणि उत्पादनक्षम माती असलेले भूभाग निवासी संकुले, गोदामे, औद्योगिक पट्टे आणि व्यावसायिक प्रकल्पांसाठी गिळंकृत केले जात आहेत. शहराच्या सीमारेषा पुढे सरकतात; पण त्याच वेगाने शेतीची सीमारेषा मागे हटते. हा विकासाचा गौरव आहे की, अन्ननिर्मितीच्या क्षमतेचा ऱ्हास? आज एका शेतकऱ्याची जमीन संपादित केली जाते. त्याला भरपाई मिळते. व्यवहार संपतो. पण त्या जमिनीवर पुढील पन्नास वर्षांत किती अन्नधान्य, भाजीपाला, फळे किंवा अन्य कृषी उत्पादन निर्माण झाले असते, याचा हिशेब कोण मांडणार? जमिनीची बाजारातील किंमत ठरवता येते; पण तिची अन्ननिर्मितीची किंमत ठरवता येत नाही. धक्कादायक बाब म्हणजे शेतीवरचा हा दबाव केवळ महामार्ग किंवा शहरांमुळे वाढत नाही. उद्योगांसाठी जमीन हवी, पायाभूत सुविधांसाठी जमीन हवी, धरणांसाठी जमीन हवी आणि आता ऊर्जा निर्मितीसाठीही मोठ्या भूभागाची गरज आहे. सौरऊर्जा स्वच्छ आणि आवश्यक आहे; पण तिच्यासाठीही सुपीक शेतीच बळी जाणार असेल, तर एका संकटावरचा उपाय दुसऱ्या संकटाची बीजे रोवणारा ठरेल. छतांवर, जलाशयांवर किंवा कमी उत्पादनक्षम जमिनीवर सौरऊर्जा उभारण्याचे पर्याय असताना सुपीक शेतजमिनीवरच पॅनेल उभारण्याचा अट्टाहास कशासाठी? याचा सर्वांत मोठा फटका भविष्यातील अन्नउत्पादनाला बसणार आहे. हवामान बदलामुळे शेती आधीच अनिश्चित झाली आहे. पाऊस कधी पडतो, किती पडतो आणि किती दिवस टिकतो याचा भरवसा राहिलेला नाही. पाण्याची उपलब्धता कमी होत आहे. जमिनीची सुपीकता घटत आहे. अशा वेळी उत्पादनक्षम जमीन वाढवण्याऐवजी आपण तीच कमी करत आहोत. लोकसंख्या नेहमीप्रमाणे सातत्याने वाढत आहे आणि त्यासोबतच अन्नाची मागणी वाढत असताना शेतीचे क्षेत्र मात्र घटत गेले, तर गणित सरळ आहे की उत्पादन घटेल, तुटवडा वाढेल आणि आयातीची वेळ येईल. आज अन्नधान्याच्या बाबतीत आत्मनिर्भरतेचा अभिमान बाळगणाऱ्या देशाला उद्या परदेशातून धान्य मागवण्याची वेळ आली तर त्याला केवळ आर्थिक अपयश म्हणता येणार नाही. युद्ध, जागतिक मंदी, हवामान संकट किंवा आंतरराष्ट्रीय बाजारातील निर्बंधांच्या काळात अन्नासाठी दुसऱ्या देशांकडे पाहावे लागणे ही राष्ट्रीय सुरक्षेलाही धोकादायक बाब ठरू शकते. म्हणून विकासाची व्याख्याच बदलण्याची वेळ आली आहे. प्रत्येक प्रकल्पासाठी जमीन उपलब्ध करून देणे हे सरकारचे कर्तव्य नाही; योग्य जमीन निवडणे हे सरकारचे कर्तव्य आहे. जमीन संपादनापूर्वी तिची उत्पादनक्षमता, सिंचनाची उपलब्धता, मातीचा दर्जा आणि भविष्यातील अन्ननिर्मितीतील योगदान यांचे स्वतंत्र मूल्यमापन झाले पाहिजे. पडीक, नापीक किंवा कमी उत्पादनक्षम जमीन उपलब्ध असताना सुपीक शेतीवर पहिला घाव घालणे थांबले पाहिजे. अधिग्रहण करण्याचा आज घेतलेला प्रत्येक जमीनविषयक निर्णय पुढच्या पिढीच्या ताटाशी जोडलेला आहे. महामार्गावर वेगाने धावणाऱ्या गाड्या, उंच इमारती आणि कारखान्यांच्या चिमण्या विकासाचे प्रतीक असतील; पण त्या विकासाला अन्न देणारी शेतीच संपली तर त्या प्रगतीचा अर्थ काय? आज जमीन विकासासाठी घेतली जात आहे; उद्या अन्नासाठी जमीन शोधण्याची वेळ येऊ नये. कारण कारखाना दुसरीकडे हलवता येतो, रस्ता बदलता येतो, शहराचे नियोजन पुन्हा करता येते; पण एकदा नष्ट झालेली सुपीक जमीन आणि तिची अन्ननिर्मितीची क्षमता परत मिळवणे सहज शक्य नाही. विकास हवा, पण शेतीच्या थडग्यावर उभा राहिलेला विकास नको. उद्याच्या भारताला केवळ स्मार्ट शहरे नकोत; त्या शहरातील नागरिकांच्या ताटात अन्नही हवे. म्हणून आजच ठरवावे लागेल की, उद्या अन्न कुठे पिकणार?

ज्ञान, विज्ञान, संस्कार आणि विवेकाची सांगड घातली तरच सक्षम राष्ट्राची निर्मिती!

भारताचे भविष्य संसद भवनात, मंत्रालयात किंवा सत्तेच्या खुर्च्यांवरच घडत नसते; ते घडत असते शाळेच्या वर्गखोलीत, महाविद्यालयाच्या परिसरात आणि विद्यार्थ्यांच्या मनात रुजणाऱ्या विचारांत!आजच्या विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत असलेली स्वप्ने, त्यांच्या हातातील कौशल्ये आणि मनातील मूल्ये उद्याच्या भारताचे स्वरूप निश्चित करणार आहेत. म्हणूनच भारताचे विद्यार्थी हे केवळ देशाचे भविष्य नसून वर्तमानातील परिवर्तनाचे महत्त्वाचे शिल्पकार आहेत.

भारत हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो. ही तरुण लोकसंख्या देशासाठी मोठी संधी आहे; मात्र केवळ तरुणांची संख्या अधिक असून चालत नाही. त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, कौशल्याधारित प्रशिक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन, रोजगाराच्या संधी आणि सामाजिक जाणीव मिळणे तितकेच आवश्यक आहे. अन्यथा लोकसंख्येचे सामर्थ्य हीच समस्या बनू शकते.

आजचा विद्यार्थी डिजिटल युगात वाढत आहे.इंटरनेट, कृत्रिम बुद्धिमत्ता, मोबाईल आणि जागतिक ज्ञानाचे दरवाजे त्याच्यासाठी खुले झाले आहेत. एका क्लिकवर जगभरातील माहिती उपलब्ध आहे. परंतु माहिती मिळणे आणि ज्ञान प्राप्त होणे यात मोठा फरक आहे. माहितीच्या महासागरात विवेकाची दिशा हरवू नये, ही आजच्या शिक्षणव्यवस्थेपुढील खरी कसोटी आहे. तंत्रज्ञानाचा वापर करणारा नव्हे, तर तंत्रज्ञानाला मानवी कल्याणासाठी दिशा देणारा विद्यार्थी घडला पाहिजे.

आज शिक्षणात स्पर्धा वाढली आहे. परीक्षेतील गुण, प्रवेश परीक्षा, पदव्या आणि नोकरी याभोवती विद्यार्थ्यांचे आयुष्य केंद्रित होताना दिसते. गुण महत्त्वाचे आहेत; परंतु तेच बुद्धिमत्तेचे आणि व्यक्तिमत्त्वाचे अंतिम मोजमाप होऊ शकत नाहीत. कमी गुण मिळाले म्हणजे विद्यार्थी कमी क्षमतेचा ठरत नाही. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काहीतरी वेगळे कौशल्य, सर्जनशीलता आणि क्षमता दडलेली असते.शिक्षणाने ती ओळखून विकसित करण्याची संधी दिली पाहिजे.



आजही ग्रामीण आणि शहरी शिक्षणामध्ये साधनसुविधांची दरी दिसते. काही विद्यार्थ्यांकडे आधुनिक प्रयोगशाळा, संगणक आणि डिजिटल शिक्षणाची साधने आहेत, तर अनेक ग्रामीण व वंचित विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागतो. शेतमजुरांची मुले, स्थलांतरित कुटुंबांतील विद्यार्थी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील बालकांचे शिक्षण अर्धवट राहणे ही केवळ त्या कुटुंबाची समस्या नाही, तर देशाच्या भविष्यापुढील मोठे आव्हान आहे. शिक्षणाची संधी ही जन्म, जात, धर्म, भाषा किंवा आर्थिक परिस्थितीवर अवलंबून राहता कामा नये.विद्यार्थ्यांना केवळ डॉक्टर, अभियंता, अधिकारी किंवा उद्योजक बनविणे हे शिक्षणाचे एकमेव उद्दिष्ट असू नये. ते संवेदनशील नागरिक, जबाबदार मतदार, पर्यावरणप्रेमी, स्त्री-पुरुष समानतेचा आदर करणारे आणि संविधानिक मूल्यांवर विश्वास ठेवणारे माणूस बनले पाहिजेत. दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव, श्रमाचा सन्मान, प्रामाणिकपणा, सहकार्य आणि सामाजिक बांधिलकी ही मूल्ये त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग झाली पाहिजेत. कारण ज्ञानाने बुद्धिमत्ता वाढते; पण संस्कारांनी माणुसकी जिवंत राहते.

यासाठी शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षक हा केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणारा घटक नसून विद्यार्थ्यांच्या विचारविश्वाला आकार देणारा मार्गदर्शक असतो. प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य, प्रयोग करण्याची संधी, चुका करून शिकण्याची मोकळीक आणि स्वतंत्र विचार करण्याची क्षमता वर्गखोलीत विकसित झाली पाहिजे. पालकांनीही मुलांची तुलना इतरांशी करण्याऐवजी त्यांच्या आवडी, क्षमता आणि प्रयत्नांना प्रोत्साहन द्यावे. शासनाने शाळांमधील शिक्षकांची उपलब्धता, पायाभूत सुविधा, वाचनसंस्कृती, क्रीडा, कला आणि व्यावसायिक शिक्षण यांना प्राधान्य दिले पाहिजे.विद्यार्थ्यांनीही आपल्या हक्कांबरोबर कर्तव्यांची जाणीव ठेवली पाहिजे. मोबाईलच्या आभासी जगात हरवून न जाता पुस्तकांशी मैत्री करावी, प्रश्न विचारावेत, नवनवीन कौशल्ये आत्मसात करावीत, अपयशातून शिकावे आणि समाजासाठी काहीतरी करण्याची उमेद बाळगावी. देशप्रेम म्हणजे केवळ घोषणा देणे नव्हे; तर आपल्या कामात प्रामाणिकपणा राखणे, सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे आणि देशाच्या प्रगतीत योगदान देणे होय.

भारताला विकसित राष्ट्र बनविण्याचे स्वप्न केवळ योजनांनी पूर्ण होणार नाही.त्यासाठी विचारशील, संशोधक, कर्तृत्ववान, चारित्र्यसंपन्न आणि माणुसकी जपणारी पिढी घडवावी लागेल. आजच्या विद्यार्थ्यांच्या हातात उद्याच्या भारताची सूत्रे आहेत. त्यांच्या स्वप्नांना संधी, कर्तृत्वाला दिशा आणि विचारांना विवेक मिळाला, तर भारताचे भविष्य निश्चितच उज्ज्वल होईल.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, देशाची खरी श्रीमंती केवळ त्याच्या नैसर्गिक साधनसंपत्तीत किंवा आर्थिक प्रगतीत नसते; ती असते त्याच्या सुशिक्षित, सुसंस्कृत आणि सजग नागरिकांत. आज आपण विद्यार्थ्यांमध्ये जे पेरू, तेच उद्या राष्ट्राच्या रूपाने उगवेल.म्हणूनच विद्यार्थ्यांकडे केवळ उद्याचे नागरिक म्हणून नव्हे, तर आजच्या भारताच्या परिवर्तनाचे सक्रिय भागीदार म्हणून पाहण्याची गरज आहे. आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन

विद्यार्थी घडला तर कुटुंब घडेल, कुटुंब घडले तर समाज घडेल आणि समाज घडला तर समर्थ, समृद्ध व संवेदनशील भारत घडेल!

-पंडित पवळे
नांदेड

पंजाब केसरी लाला लजपत राय



लाला लजपतराय यांचा जन्म २८ जानेवारी १८३६ रोजी पंजाबमधील धुंढिक येथे झाला. ते पंजाबी, भारतीय राजकारणी व लेखक होते. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी योगदान दिले. लाल-बाल-पाल या त्रिकुटापैकी लाल म्हणजे लाला लजपत राय हे होते. ते जहालमतवादी नेते होते. त्यांना पंजाब केसरी असे म्हणतात. त्यांनी पंजाब नॅशनल बँकेची स्थापना केली.

लाला लजपतराय यांचे वडील मुन्शी राधाकृष्ण अग्रवाल सरकारी शाळेत उर्दू आणि पर्शियनचे शिक्षक होते. त्यांच्या आईचे नाव गुलाबदेवी अग्रवाल होते. १८४९ मध्ये लाला लजपतरायांचा विवाह राधादेवींशी झाला. १८७० च्या दशकाच्या उत्तरार्धात त्यांच्या वडिलांची बदली रेवरी येथे झाली. तेथील सरकारी उच्च माध्यमिक शाळेत लजपतरायांचे सुरुवातीचे शिक्षण झाले.

सुरुवातीच्या आयुष्यात लजपतराय यांचे उदारमतवादी विचार आणि हिंदुत्वावरील त्यांचा विश्वास त्यांचे वडील आणि अतिशय धार्मिक आई यांच्यामुळे तयार झाला. १८८० मध्ये लजपतरायांनी कायद्याचा अभ्यास करण्यासाठी लाहोर येथील सरकारी महाविद्यालयात प्रवेश घेतला. येथेच ते देशभक्त आणि भविष्यातील स्वातंत्र्यसैनिक लाला हंसराज आणि पंडित गुरुदत्त यांच्या संपर्कात आले. लाहोरमध्ये शिकत असताना स्वामी दयानंद सरस्वतींच्या हिंदू सुधारणा चळवळीचा प्रभाव त्यांच्यावर पडला आणि ते आर्यसमाजाचे सदस्य बनले. तसेच लाहोर स्थित आर्य गॅझेटचे संस्थापक, संपादक बनले.

हिंदुत्वावरील वाढत्या विश्वासामुळे ते हिंदू महासभेत सामील झाले. त्यामुळे त्यांना नौजवान भारत सभेच्या टीकेला सामोरे जावे लागले. कारण ही महासभा धर्मनिरपेक्ष नव्हती. भारतीय उपखंडातील हिंदू जीवनपद्धतीवर लक्ष केंद्रित केल्यामुळे पुढे भारतीय स्वातंत्र्यासाठीच्या यशस्वी आंदोलनासाठी त्यांनी शांततामय मार्गाने चळवळी केल्या. १८८४ मध्ये त्यांच्या वडिलांची बदली रोहतक येथे झाली आणि लाहोर येथील अभ्यास संपवून लजपतरायसुद्धा त्यांच्या बरोबर आले. १८८६ मध्ये ते वडिलांच्या बदलीबरोबर हिसारला आले आणि तेथे त्यांनी वकिलीचा व्यवसाय सुरू केला. बाबू चुडामणींसह लजपतराय हिसारच्या बार कौन्सिलचे संस्थापक सदस्य बनले.

लहानपणापासूनच देशसेवा करण्याची राय यांची तीव्र इच्छा होती. त्यामुळे देशाची पारतंत्र्यातून सुटका करण्याची लजपतरायांनी शपथ घेतली. त्याच वर्षी त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची हिसार जिल्हा शाखा स्थापन केली. तसेच बाबू चुडामणी, चंदूलाल तयाल, हरी-लाल तयाल आणि बालमुकुंद तयाल हे तयाल बंधू, डॉ. रामजीलाल हुडा, डॉ.धनीराम, आर्यसमाजी पंडित मुरारीलाल, शेठ छाजूराम जाट आणि देवराज संधीर यांच्याबरोबर लाला लजपतरायांनी आर्य समाजाची स्थापनासुद्धा केली. काँग्रेसच्या अलाहाबाद येथील वार्षिक अधिवेशनात हिसार जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी त्यांची १८८८ आणि १८८९ मध्ये निवड झाली. १८९२ मध्ये उच्च न्यायालयात वकिली करण्यासाठी ते लाहोर येथे गेले. स्वातंत्र्य मिळवण्यासाठी भारताच्या राजकीय धोरणाला आकार देण्यासाठी ते पत्रकारितासुद्धा करत. त्यांनी द ट्रिब्यून सहित अनेक वृत्तपत्रांमध्ये नियमितपणे लेखन केले.

१८८६ मध्ये त्यांनी महात्मा हंसराज यांना लाहोरमध्ये दयानंद अंग्लो-वैदिक स्कूलची स्थापना करण्यास मदत केली. भारताच्या १९४७ साली झालेल्या फाळणीनंतर लाहोरमधील या विद्यालयाचे रूपांतर इस्लामिया कॉलेजमध्ये झाले.

१९१४ मध्ये स्वातंत्र्यल ढ्यात योगदान देण्यासाठी लजपतरायांनी वकिलीला रामराम ठोकला. ऑक्टोबर १९१७ मध्ये त्यांनी न्यूयॉर्कमध्ये भारतीय होमरूल लीगची स्थापना केली.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये सहभागी झाल्यानंतर आणि पंजाबमधील राजकीय निदर्शनामध्ये भाग घेतल्यानंतर, मे १९०७ मध्ये कोणताही खटला न चालवता लाला लजपतरायांची ब्रह्मदेशातील मंडालेच्या तुरुंगात रवानगी करण्यात आली. पण त्यांना अटक करून ठेवण्यासाठी पुरेसा पुरावा नाही, असे लॉर्ड मिंटो यांनी ठरवल्याने नोव्हेंबरमध्ये त्यांना परत जाण्याची परवानगी देण्यात आली.

१९२० साली कोलकाता येथे भरलेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या खास अधिवेशनात ते अध्यक्ष म्हणून निवडून आले. १९२१ मध्ये त्यांनी लाहोरमध्ये लोक सेवक मंडळ या 'ना नफा' तत्त्वावरील कल्याणकारी संघटनेची स्थापना केली. फाळणीनंतर या संस्थेचे कार्यालय दिल्ली येथे हलवण्यात आले. भारतभरात या संस्थेच्या अनेक शाखा आहेत.

१९२८ मध्ये भारतातील राजकीय परिस्थितीबद्दल अहवाल देण्यासाठी सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखाली ब्रिटिश सरकारने एका आयोगाची स्थापना केली. भारतातील राजकीय पक्षांनी या आयोगावर बहिष्कार घातला, कारण या आयोगाच्या सदस्यांमध्ये एकही भारतीयाचा समावेश नव्हता. या आयोगाविरुद्ध भारतभर निदर्शने झाली. ३० ऑक्टोबर १९२८ रोजी जेव्हा या आयोगाने लाहोरला भेट दिली, तेव्हा त्याविरुद्ध मूक निदर्शनांचे नेतृत्व लाला लजपतराय यांनी केले. पोलीस अधीक्षक जेम्स स्कॉट यांनी या निदर्शकांवर लाठी हल्ला करण्याचे आदेश दिले. जखमी होऊनसुद्धा लाला लजपतरायांनी या जमावासमोर भाषण केले. आज मी ज्या लाठ्या खाल्ल्या, त्या म्हणजे ब्रिटिश सरकारच्या भारतातील राजवटीच्या शवपेटिकेवरील शेवटचे खिळे ठरतील, असे मी जाहीर करतो. हे त्यांचे त्यावेळचे उद्गार होते. निदर्शनांच्या वेळेला झालेल्या लाठी हल्ल्यातून लाला लजपतराय पूर्णपणे बरे झाले नाहीत आणि हृदय विकाराच्या धक्क्याने १७ नोव्हेंबर १९२८ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

-नासा येवतीकर,
धर्माबाद
मो. ९४२३६२५७६९

पुस्तकांच्या पलीकडेही एक विद्यार्थी असतो!

दरवर्षी १७ नोव्हेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ विद्यार्थ्यांचा गौरव करण्याचा किंवा शैक्षणिक संस्थांमध्ये विविध कार्यक्रम आयोजित करण्याचा दिवस नाही, तर विद्यार्थ्यांचे प्रश्न, त्यांचे अधिकार, त्यांची स्वप्ने आणि त्यांच्या भविष्याचा गांभीर्याने विचार करण्याची संधी आहे. महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारातून आत येणारा प्रत्येक विद्यार्थी सोबत काही स्वप्ने घेऊन येतो. कोणाला डॉक्टर व्हायचे असते, कोणाला अभियंता, कोणाला प्राध्यापक, तर कोणाला स्वतःच्या पायावर उभे राहून कुटुंबाचा आधार बनायचे असते. मात्र या स्वप्नांच्या प्रवासात प्रत्येक विद्यार्थ्याला समान संधी, अनुकूल परिस्थिती आणि अपेक्षित मार्गदर्शन मिळतेच असे नाही. त्यामुळे विद्यार्थी दिनाच्या निमित्ताने शिक्षणव्यवस्थेतील वास्तवाकडे पाहणे आवश्यक ठरते.

आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिनाच्या इतिहासाला संघर्षाची पार्श्वभूमी आहे. १७ नोव्हेंबर १९३९ रोजी तत्कालीन चेकोस्लोव्हाकियातील प्राग येथे नाझी सत्तेविरुद्ध आवाज उठवणाऱ्या विद्यार्थ्यांवर दडपशाही करण्यात आली. नऊ विद्यार्थी नेते आणि प्राध्यापकांना मृत्युदंड देण्यात आला, तर बाराशेहून अधिक विद्यार्थ्यांना छळछावण्यांमध्ये पाठविण्यात आले. चेक विद्यापीठेही बंद करण्यात आली. या विद्यार्थ्यांच्या संघर्षाच्या स्मरणार्थ १९४१ मध्ये लंडन येथे आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिनाची परंपरा सुरू झाली. त्यामुळे हा दिवस विद्यार्थ्यांच्या स्वातंत्र्याचा, अधिकारांचा आणि शिक्षणाच्या मूलभूत हक्काचा प्रतीकात्मक दिवस बनला.

आजच्या काळात विद्यार्थ्यांचे प्रश्न बदलले आहेत; परंतु त्यांचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. शिक्षणाच्या संधी वाढल्या, महाविद्यालयांची संख्या वाढली, डिजिटल शिक्षणाचा विस्तार झाला; तरीही गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचले आहे का, हा प्रश्न कायम आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुले, पहिल्या पिढीतील शिकणारे विद्यार्थी आणि शिक्षणासाठी गाव सोडून शहरात येणारे विद्यार्थी यांच्यासमोर वेगवेगळी आव्हाने आहेत. काही विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक मदत मिळवताना अडचणी येतात, तर काहींना प्रवास, निवास आणि शैक्षणिक साहित्याचा खर्च पेलणे कठीण जाते. शिक्षणाची इच्छा असूनही परिस्थितीमुळे अनेक विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना मर्यादा पडतात.



आजचा विद्यार्थी एका वेगळ्याच स्पर्धेच्या वातावरणात जगत आहे. परीक्षेतील गुण, प्रवेश परीक्षा, नोकरीची अनिश्चितता, कौशल्य विकास आणि भविष्याची चिंता यामुळे त्याच्यावर मानसिक दबाव वाढत आहे. प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता, आवड आणि विचार करण्याची पद्धत वेगळी असते. मात्र शिक्षणव्यवस्थेत अनेकदा सर्व विद्यार्थ्यांकडून एकाच प्रकारच्या यशाची अपेक्षा केली जाते. चांगले गुण मिळवणारा विद्यार्थी हुशार आणि कमी गुण मिळवणारा विद्यार्थी कमी बुद्धिमान, असे सरसकट निष्कर्ष काढले जातात. वास्तविक, गुणपत्रिका ही विद्यार्थ्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाची ओळख असू शकत नाही. एखाद्या विद्यार्थ्यामध्ये साहित्याची आवड असते, दुसऱ्याला खेळाची आवड असते, तर तिसरा विद्यार्थी कलाक्षेत्रात आपली क्षमता सिद्ध करू शकतो. या विविध क्षमतांना वाव देणे हे शिक्षणाचे खरे उद्दिष्ट असले पाहिजे.

डिजिटल युगाने विद्यार्थ्यांसमोर ज्ञानाची नवी दालने खुली केली आहेत. मोबाईल, इंटरनेट आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून माहिती सहज उपलब्ध होत आहे. परंतु माहिती मिळणे आणि ज्ञान आत्मसात करणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. सोशल मीडियावर तासन्तास वेळ घालवणारा विद्यार्थी अभ्यासासाठी मात्र वेळेचे नियोजन करू शकत नाही, अशी विसंगती अनेकदा दिसून येते. इंटरनेटचा वापर ज्ञानवृद्धीसाठी होण्याऐवजी मनोरंजन आणि अनावश्यक गोष्टींसाठी अधिक होत असेल, तर त्याचा विचार करण्याची गरज आहे. तंत्रज्ञानाने विद्यार्थ्यांना अधिक सक्षम बनवावे; त्यांच्या विचारशक्तीची जागा घेऊ नये.

विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षक म्हणजे केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणारी व्यक्ती नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या विचारांना दिशा देणारा, त्यांच्या क्षमतांना ओळखणारा आणि अडचणीच्या काळात त्यांना आधार देणारा मार्गदर्शक असतो. विद्यार्थ्याला कधीकधी पुस्तकातील उत्तरापेक्षा त्याचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणाऱ्या शिक्षकाची अधिक गरज असते. एखाद्या विद्यार्थ्याने परीक्षेत कमी गुण मिळवले म्हणून त्याला निराश करण्याऐवजी त्याच्या अडचणी समजून घेणे महत्त्वाचे आहे. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात विश्वासाचे नाते निर्माण झाले, तर शिक्षणाची प्रक्रिया अधिक अर्थपूर्ण होते.

पालकांनीही मुलांच्या शैक्षणिक यशाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. शेजाऱ्याच्या मुलाला किती गुण मिळाले, कोणत्या महाविद्यालयात प्रवेश मिळाला किंवा कोणती नोकरी मिळाली, याची तुलना स्वतःच्या मुलांशी करणे टाळले पाहिजे. प्रत्येक मुलाची क्षमता आणि प्रगतीचा वेग वेगळा असतो. मुलांच्या स्वप्नांना समजून घेणे, त्यांच्या आवडीला प्रोत्साहन देणे आणि अपयशाच्या काळात त्यांच्यासोबत उभे राहणे ही पालकांची खरी जबाबदारी आहे. शैक्षणिक संस्थांनीही केवळ पदवी देण्यापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांमध्ये विचारक्षमता, संवादकौशल्य, सामाजिक जाणीव, वाचनसंस्कृती, संशोधनवृत्ती आणि रोजगाराभिमुख कौशल्ये विकसित करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. विद्यार्थ्यांना केवळ नोकरी मिळविण्यासाठी नव्हे, तर जबाबदार नागरिक म्हणून घडविण्यासाठी शिक्षण दिले पाहिजे. शासनानेही गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिष्यवृत्ती, वसतिगृहे, ग्रंथालये आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षणाच्या सुविधा अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

विद्यार्थी दिन साजरा करताना आपण विद्यार्थ्यांच्या हातात केवळ शुभेच्छांचे गुलाब देऊन थांबता कामा नये. त्यांच्या हातात चांगली पुस्तके, डोळ्यांसमोर आशादायी भविष्य आणि मनात आत्मविश्वास निर्माण करण्याची जबाबदारी समाजाने स्वीकारली पाहिजे. कारण आजचा विद्यार्थी उद्याचा शिक्षक, संशोधक, शेतकरी, उद्योजक, प्रशासक आणि जबाबदार नागरिक असणार आहे.

मला वाटते की, विद्यार्थी म्हणजे केवळ परीक्षेला बसणारी किंवा पदवी मिळविणारी व्यक्ती नाही. तो सतत शिकणारा, प्रश्न विचारणारा, चुका करून त्यातून अनुभव घेणारा आणि स्वतःसह समाजाचे भविष्य घडविणारा घटक आहे. विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना संधी मिळाली, त्यांच्या प्रश्नांना समजून घेतले आणि त्यांच्या क्षमतांना योग्य दिशा मिळाली, तरच शिक्षणाचा खरा अर्थ साकार होईल. विद्यार्थ्यांचा सन्मान एका दिवसापुरता मर्यादित न राहता त्यांच्या संपूर्ण शैक्षणिक प्रवासात जपला गेला पाहिजे. कारण विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल असेल, तरच समाजाचे वर्तमान समृद्ध आणि राष्ट्राचे उद्याचे चित्र आशादायी असेल!

-प्रा. डॉ. कृष्णा तेरकर
धाराशिव
मो. ९४२२१०५१०१

कोळी महादेव समाजाचा जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा धडकला; ३० नोव्हेंबरपर्यंत अल्टिमेटम





नांदेड (प्रतिनिधी)– मराठवाड्यातील आदिवासी कोळी महादेव जमातींच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकासासंदर्भात १९८१ पासूनचा शासकीय लेखाजोखा जाहीर करून श्वेतपत्रिका प्रसिद्ध करावी, यासह अन्य मागण्यांसाठी दि. १६ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला. यावेळी पदाधिकाऱ्यांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

मराठवाड्यातील आदिवासी कोळी महादेव, कोळी मल्हार व टोकरे कोळी जमातींच्या घटनात्मक हक्कांची प्रभावी अंमलबजावणी, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी मंजूर झालेल्या निधीचा प्रत्यक्ष विनियोग आणि शासकीय योजनांचा लाभ या जमातीच्या पात्र नागरिकांपर्यंत किती प्रमाणात पोहोचला, याचा सन १९८१ पासूनचा अधिकृत लेखाजोखा महाराष्ट्र शासनाने जनतेसमोर जाहीर करणे आवश्यक आहे.

तत्कालीन विरोधी पक्षनेते तथा विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १२ वर्षांपूर्वी मुंबई येथील मोर्चा प्रसंगी दिलेल्या आश्वासनानुसार अद्यापही कार्यवाही केलेली नाही. यावर कारवाई करावी, जमातींच्या विकासाचा संपूर्ण शासकीय लेखाजोखा प्रसिद्ध करून श्वेतपत्रिका जाहीर करावी, संबंधित जमातीच्या नागरिकांना जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेतील अडचणी दूर कराव्यात, शिक्षण, रोजगार, आरोग्य, घरकुल, आर्थिक विकास व इतर योजनांतील प्रत्यक्ष लाभार्थ्यांची अधिकृत माहिती जाहीर करावी, अनुसूचित जमातींच्या घटनात्मक हक्कांची प्रभावी अंमलबजावणी करून पात्र नागरिकांना कायद्यानुसार लाभ मिळण्याची खात्री करावी, या मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात आला.

शहरातील आयटीआय चौक येथील महात्मा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकापासून सकाळी ११ वाजता हा मोर्चा सुरू झाला. यानंतर मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या मोर्चात मार्गदर्शक ॲड. परमेश्वर गोणारे यांच्यासह अनेक समाजबांधव पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले होते.

मराठवाड्यातील आदिवासी कोळी महादेव जमातींच्या विकासासंदर्भात १९८१ पासूनचा शासकीय लेखाजोखा जाहीर करून श्वेतपत्रिका जाहीर करावी. हा मोर्चा केवळ ट्रेलर आहे, जर शासनाने मागण्यांची दखल घेतली नाही तर यापुढे समाजाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा मराठवाडा अध्यक्ष नागनाथराव घिसेवाड यांनी दिला.

३० नोव्हेंबरपर्यंत शासनाने सकारात्मक कार्यवाही केली नाही तर आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर समाजाकडून वेगळी भूमिका घेण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

छोटेसे का असेना, स्वतःचे साम्राज्य उभे करा

प्रा. डॉ. नामदेव दळवी यांचे प्रतिपादन

नांदेड (प्रतिनिधी)– परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी प्रत्येकाने आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर छोटेच का असेना, पण स्वतःचे साम्राज्य उभे केले पाहिजे. स्वावलंबन, मेहनत आणि जिद्द यांच्या जोरावर यशाची नवी उंची गाठता येते, असे प्रतिपादन प्रा. डॉ. नामदेव दळवी यांनी केले.

शिव-प्रणिती फाऊंडेशनच्या वतीने 'भूमिपुत्रांचा सन्मान सोहळा२०२६' तसेच बळीराजा महोत्सव व दीपोत्सव या कार्यक्रमाचे आयोजन पिंपळदरी येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. नामदेव दळवी बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, आपल्या गावावर, आपल्या मातीवर आणि आपल्या कर्तृत्वावर विश्वास ठेवून प्रत्येकाने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली पाहिजे. दुसऱ्यांच्या आधारावर उभे राहण्यापेक्षा स्वतःच्या कष्टातून निर्माण केलेले छोटेसे विश्वदेखील मोठ्या समाधानाचे आणि अभिमानाचे असते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. तुकाराम जाधव करमाळेकर होते. प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून प्रा. डॉ. नामदेव दळवी, कपिलभाई वानखेडे, पत्रकार बालाजी शिंदे आणि गजानन जाधव उपस्थित होते. यावेळी भूमिपुत्र प्रा. डॉ. एन. आर. कांबळे व प्रा. डी. डी. जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करून गावाचे नाव उज्ज्वल करणाऱ्या भूमिपुत्रांचा यावेळी सन्मान करण्यात आला. बळीराजाच्या कष्टाला सलाम करत ग्रामीण भागातील कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्याचा उपक्रम शिव-प्रणिती फाऊंडेशनच्या वतीने राबविण्यात आला. या उपक्रमाचे उपस्थित मान्यवर व नागरिकांनी कौतुक केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिव-प्रणिती फाऊंडेशनचे अध्यक्ष इंजि. प्रवीण जाधव पिंपळदरीकर यांनी केले. यावेळी त्यांनी फाऊंडेशनच्या विविध सामाजिक, शैक्षणिक व सेवाभावी उपक्रमांचा आढावा मांडला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. बालाजी गारपले यांनी मानले. कार्यक्रमास पिंपळदरीसह परिसरातील नागरिक, मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, शेतकरी, विद्यार्थी व युवक उपस्थित होते.

स्वारातीम विद्यापीठात बिरसा मुंडा जयंती साजरी



नांदेड (प्रतिनिधी)– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात बिरसा मुंडा यांची जयंती रविवार, दि.१५ नोव्हेंबर, २०२६ रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षात आयोजित जयंती कार्यक्रमात बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, उपकुलसचिव रामदास पेद्देवाड, अधीक्षक एच. आर. डोंगरे, अनिल कळसकर यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवर, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्यांना अभिवादन केले.

स्वरगंध संगीत मंचाचा पाचवा वर्धापनदिन; 'तारों की बरसात सुरों के साथ' कार्यक्रमास रसिकांचा प्रतिसाद

नांदेड (प्रतिनिधी)– शहरातील कुसुम सभागृहात 'तारों की बरसात, सुरों के साथ' हा संगीतमय कार्यक्रम शनिवार, दिनांक १४ नोव्हेंबर रोजी अत्यंत उत्साहात संपन्न झाला. स्वरगंध संगीत मंच, नांदेडच्या पाचव्या वर्धापनदिनानिमित्त सायंकाळी ६ ते रात्री १० या वेळेत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



स्वरगंध संगीत मंच, नांदेड हा गेल्या अनेक वर्षांपासून नांदेडच्या सांस्कृतिक व संगीत क्षेत्रात कार्यरत असून नवीन आणि अनुभवी कलाकारांना सोबत घेऊन संगीताची वाटचाल करीत आहे. विशेष म्हणजे नवोदित कलाकारांना गायनाची संधी देऊन त्यांच्यातील कलागुणांना वाव मिळावा, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने मंच सातत्याने प्रयत्नशील आहे. नव्या आणि जुन्या कलाकारांचा सुरेल संगम हे या संगीत मंचाचे वैशिष्ट्य ठरले आहे.

मंचाच्या पाचव्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून आयोजित या कार्यक्रमात मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय व सदाबहार गीते, सुपरहिट बॉलीवूड गीतं सादर करण्यात आली.

या कार्यक्रमात गायक गोविंद कंधारे, डॉ. चंद्रशेखर किसवे, राजन करकरे, सुभाष जोंधळे, डॉ. विनोद केचकर, गजानन वाळूकर, प्रदीप सूर्यवंशी, गणेश नाईकवाडे, ललिता दुलगच, दीपाली चौधरी, प्रियंका बोधनकर, आकांक्षा मोतेवार आणि प्रतीक्षा किंगरे या कलाकारांनी विविध गीतं सादर केली.

या कार्यक्रमाचे उद्घाटन उद्योजक अनिल शेटकार यांच्या हस्ते झाले तर गोदातीर समाचारचे संपादक केशव घोणसे पाटील यांची यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. कार्यक्रमाचे निर्माता साईनाथ लिंगाडे, संयोजक लक्ष्मीकांत लिंगाडे, सहनिर्माते शिवाजी टाक व संतोष टाक असून कार्यक्रमाची संकल्पना आणि नियोजन अंबादास पार्डीकर यांची होती. संजय काचावर, जोगेंद्र दुलगच आणि दत्ता पारवेकर यांचे त्यांना सहकार्य लाभले.

एमजीएममध्ये पंडित नेहरू जयंती साजरी



नांदेड (प्रतिनिधी)– एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयात संचालिका डॉ. गीता लाठकर यांच्या मार्गदर्शनात दि. १४ नोव्हेंबर २०२६ रोजी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची १३७ वी जयंती साजरी करण्यात आली. त्यांचा जन्म १४ नोव्हेंबर १८८९ रोजी प्रयागराज येथे झाला होता.

लहान मुलांवरील त्यांच्या प्रेमामुळे हा दिवस देशभरात 'बालदिन' म्हणूनही साजरा केला जातो आणि शाळा महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. एमजीएममध्येही जयंती कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी महाविद्यालयातील शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. जयंती कार्यक्रमासाठी ग्रंथालय प्रमुख डॉ. गोविंद हंबर्डे, आकाश तेलंग आणि ज्ञानेश्वर पावडे यांनी पुढाकार घेतला.

उमरी येथे क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांची जयंती साजरी



उमरी (प्रतिनिधी)– क्रांतीवीर लहुजी साळवे जयंती मंडळ उमरी व मातंग समाज बांधवांच्या वतीने क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांची २३२ वी जयंती उमरी येथील लहुजी साळवे चौक, मुदखेड रोड येथे उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. उमरी नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष कैलास गोरठेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी 'जय लहुजी' च्या जयघोषाने उमरी परिसर दुमदुमून गेला होता. ध्वजारोहणानंतर छोटेखानी जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेच्या अध्यक्षस्थानी स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. माधवराव विभूते तर प्रमुख पाहुणे उद्योजक सर्जेराव पाटील ढगे, नगर पालिकेचे नगरसेवक ईरबा शेळके, किशन गायकवाड, दिगंबरराव गायकवाड नागठाणेकर यांच्यासह अनेक मान्यवरांनी लहुजी वस्ताद साळवे यांच्या जीवनावर व त्यांच्या क्रांतिकारक कार्यावर मनोगत व्यक्त केले. लहुजी वस्तादांनी समाजासाठी दिलेले योगदान तरुण पिढीने लक्षात ठेवावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

यावेळी कैलास सूर्यवंशी साहेबराव गव्हाळकर, किशनराव इंगळे, दिनकर भंडारे, करण शिंदे, संजय वाघमारे, दत्ता गोणारे, राजू झुंजारे, सचिन सूर्यवंशी, परमेश्वर सूर्यवंशी, नागेश नामेवार व सर्व मातंग समाज बांधव, परिसरातील नागरिक, तरुण कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

मागासवर्गीय गुणवंत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी २० हजारांचे प्रोत्साहनपर अनुदान

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्हा परिषद नांदेडच्या स्वउत्पन्नातून देण्यात येणाऱ्या २० टक्के उपकर योजनेंतर्गत मागासवर्गीय गुणवंत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना प्रत्येकी २० हजार रुपये अनुदान दिले जाणार असल्याची माहिती जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांनी दिली आहे.

या योजनेचा लाभ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना मिळणार आहे. यापूर्वी या योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा लाभ घेता येणार नाही.

योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपर्यंत असणे आवश्यक आहे. तहसीलदारांनी निर्गमित केलेला उत्पन्नाचा दाखला, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जातीचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, अर्जदार किंवा कुटुंबाचे रेशनकार्डची साक्षांकित प्रत आदी कागदपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. एका कुटुंबातील केवळ एका व्यक्तीस या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.

अर्जदार विद्यार्थी कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा. जानेवारी २०२३ पासून अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत एमपीएससी, यूपीएससी, बँकिंग किंवा रेल्वे परीक्षेतील पूर्व अथवा मुख्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार शासकीय सेवेत कार्यरत नसावा. विद्यार्थ्यांचे वय १८ ते ४३ वर्षे असणे बंधनकारक आहे. सन २०२६-२७ या वर्षात ज्या योजना राबविण्यात येतील त्या योजनेसाठी कोणत्याही एका योजनेस लाभ देण्यात येईल.

इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज स्वसाक्षांकित करून आपल्या तालुक्यातील पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी कार्यालयात सोमवार ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत. या योजनेतील लाभार्थ्यांची निवड लॉटरी पद्धतीने करण्यात येणार असल्याचेही जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांनी कळविले आहे.

लहुजी साळवे यांच्या जयंतीनिमित्त हडको येथील सभागृहात ध्वजारोहण व अभिवादन



नवीन नांदेड (प्रतिनिधी)– लहुजी साळवे सार्वजनिक जयंती मंडळाच्या वतीने १४ नोव्हेंबर रोजी हडको येथील लहुजी साळवे सभागृहात ध्वजारोहण व लहुजी साळवे यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. यावेळी समाज बांधवांसह नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हडको येथील लहुजी साळवे सभागृहात सार्वजनिक जयंती मंडळ अध्यक्ष नितीन वाघमारे व सचिव पप्पू गायकवाड, कार्याध्यक्ष दया वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली अभिवादन सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ नागरिक माधवराव राजकौर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले तर सभागृहातील लहुजी साळवे यांच्या पुतळ्यास नगरसेवक प्रतिनिधी राजू लांडगे, माजी नगरसेविका सौ. बेबीताई गुपीले, छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा पुरस्कार प्राप्त जनार्दन गुपीले, दलित मित्र माधव अंबटवार, आर. जे. वाघमारे, नारायण कोलंबीकर, उत्तम घोडजकर, मेजर हरिश्चंद्र गुपीले, सुजित निळकंठे, ज्ञानेश्वर ढाकणीकर, यशवंत गादेकर, सुनिल अंबुलगेकर, शंकर धिरडीकर, बालाजी गवाले, अंबादास मेकाले, बालाजी पाटोळे, शिवाजी कांबळे, शाहीर गौतम पवार यांच्यासह सिडको, हडको परिसरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आजपासून नांदेड ते येहळेगाव पायी यात्रा-दिंडी सोहळा

नांदेड (प्रतिनिधी)– सद्गुरू माधवानंद महाराज यांच्या कृपाआशीर्वादाने आणि कार्तिकी एकादशीनिमित्त नांदेड ते येहळेगाव (तु.) येथील तुकामाई समाधी मंदिरापर्यंत चार दिवसीय पायी यात्रा व दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. ही यात्रा १७ ते २० नोव्हेंबर या कालावधीत संपन्न होणार आहे.

दिंडी सोहळ्याची सुरुवात १७ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ७:३० वाजता श्री महादेव मंदिर, चैतन्य नगर, नांदेड येथून होणार आहे. एकूण ६६ किमीचा हा प्रवास असून, रोज १८ किमी अंतर पायी यात्रा चालणार आहे. हरीपंथा चाललो आम्हा या भावनांसह निघणाऱ्या या अलौकिक सोहळ्याचा व दिंडीचा लाभ घ्यावा, असे आवाहन ॲड. रमेश राजूरकर, सतीश देशमुख, दुर्गादास राखे, अमोल कंडारकर यांनी केले आहे.

तरोडा सेंटरमध्ये वृत्तपत्र विक्रेत्यांना दिवाळी फराळाचे वाटप



नांदेड (प्रतिनिधी)– दररोज सकाळी पहाटेच्या अंधारात सर्वांच्या घरोघरी आवडते वृत्तपत्र पोहोचविणाऱ्या वृत्तपत्र विक्रेते बंधूंना दिवाळीच्या निमित्ताने गोड फराळ वाटप करून सन्मानित करण्यात आले.

दि. १० नोव्हेंबर रोजी तरोडा सेंटर येथे हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. तरोडा सेंटर येथील कार्यक्षम व वृत्तपत्र विक्रेते मारोती संभाजी गायकवाड, प्रशांत धाकपाडे, संजय पाटील, मारुती सूर्यवंशी, देवीदासराव कौठेकर व ज्येष्ठ सदस्य राजेश्वर लोकरे यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी तरोडा सेंटर येथील एकूण ८० वृत्तपत्र विक्रेते व लाईनवरील बंधू यांना दिवाळीच्या फराळाचे वाटप करण्यात आले. दररोज सकाळी वाचकांना वेळेवर वृत्तपत्र पोहोचविणारे हे विक्रेते म्हणजे वृत्तपत्र वितरण व्यवस्थेचा कणा आहेत, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

हनमंत माऊली, संतोष मोरे, संजय लोकडे, केरबा आणेराव, योगेश मुर्केवार, ज्ञानोबा नरवाडे, विजय कल्याणकर, राजेश राचा, सुभाष चव्हाण, बालाजी पावडे, भारत कळसे, नागनाथ वंगावार, राजू वंगलवार, नामदेवराव तिडके, प्रभाकर नरवाडे, दत्तात्रय कर्पे, गणेशराव येलत्रे, संघरत्न बुक्तरे, शिवाजी एकलारे, चेतन चौधरी, संजय चलिंद्रवार, दशरथ पांचाळ, संदेश नरवाडे, ऋत्विक चौधरी, दीपक गंगाधर योगी व लक्ष्मीकांत पवार यांचा यावेळी सहभाग होता.

दिवाळीच्या आनंदात वृत्तपत्र विक्रेत्यांचा केलेला हा सन्मान कौतुकास्पद ठरला.

'झुंज कॅन्सरशी' ग्रंथाची राज्यस्तरीय महामृत्युंजय वाङ्मय पुरस्कारासाठी निवड

नांदेड (प्रतिनिधी)– गडचिरोली येथील नाट्यश्री साहित्य कला मंचच्या वतीने राज्यस्तरीय 'महामृत्युंजय वाङ्मय पुरस्कार २०२६' साठी अनुवादित साहित्य गटातून नांदेड येथील साहित्यिक व अनुवादक जयराम नारायण धोंगडे यांनी अनुवादित केलेल्या 'झुंज कॅन्सरशी' या ग्रंथाची निवड झाली आहे.



यशोदा हॉस्पिटल हैदराबाद येथील ज्येष्ठ कर्करोगतज्ज्ञ तथा रोबोटिक सर्जन डॉ. सचिन मर्दा यांच्या I m Unstoppable या इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद म्हणजे 'झुंज कॅन्सरशी' हा ग्रंथ होय. कर्करोगाशी लढा देणाऱ्या रुग्णांना जगण्याची उमेद, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोन देणाऱ्या या पुस्तकाचा आशय मराठी वाचकांपर्यंत पोहोचविण्याचे काम जयराम धोंगडे यांनी अनुवादाच्या माध्यमातून केले आहे.

या पुरस्काराचा वितरण सोहळा रविवार, दि. २० डिसेंबर २०२६ रोजी गडचिरोली येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. पुरस्काराचे संयोजक चुडाराम बल्हारपुरे यांनी निवड झालेल्या सर्व साहित्यिकांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील लेखनप्रवासासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत. जयराम धोंगडे यांच्या या साहित्यिक यशाबद्दल साहित्यिक वर्तुळातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती...

शिवार

संत्रा बागेत खत, ओलित व्यवस्थापन

संत्रा-मोसंबी बागेपासून आर्थिक उत्पादन मिळण्यासाठी आंबिया बहाराची शास्त्रीय दृष्टीने निगा राखणे गरजेचे आहे.

- झाडास ताण बसला हे कसे ओळखावे? : ताण सुरू करण्यापूर्वी झाडावरील पूर्वीची फळे काढावीत. बागेचे पाणी हळूहळू कमी आणि नंतर पूर्ण बंद करावे. ताण सुरू केल्यानंतर पानांचा मूळचा रंग कमी होऊन ती फिकट व नंतर पिवळी पडतात. असे होत असताना पाने गळून पडेपर्यंत अन्न तयार करण्याची प्रक्रिया सुरूच ठेवतात. साधारणपणे २५ टक्के पानगळ झाल्यास, ताण बसला असे समजावे. अशाप्रकारे झाडांना ताण दिल्यास एकाच वेळी फुलोरा येतो.
- आंबिया बहाराकरिता खत नियोजन : जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात किंवा तापमानात वाढ होताच हलके ओलीत करावे. ताण तोडताना हलक्या ओलिता अगोदर प्रत्येक झाडाला ६०० ग्रॅम नत्र + ४०० ग्रॅम स्फुरद + ४०० ग्रॅम पालाश आणि भरखते द्यावीत. त्यानंतर पाच ते सात दिवसांनी दुसरे पाणी द्यावे. तिसऱ्या पाळीला भरपूर पाणी द्यावे. ताण सोडल्यानंतर २० ते २५ दिवसांनी फुले येतात. त्यानंतर उरलेल्या नत्राचा (अर्धा) हप्ता एक ते दीड महिन्याने किंवा फळे वाटाण्याच्या आकाराची झाल्यावर द्यावा. हलक्या जमिनीत नत्राची मात्रा तीन ते चार हप्त्यांत विभागून दिल्यास जास्त फायदेशीर ठरते.
- ओलित व्यवस्थापन : आंबिया बहाराची फळे उन्हाळ्यात झाडावर पोसली जातात. त्यामुळे उन्हाळ्यात पाण्याचा साठा उपलब्ध असणे आवश्यक आहे. जमिनीतील ओलावा कमी झाल्यास फळगळ होते व फळांची प्रत खालावते. त्यामुळे आंबिया बहर घेताना ओलिताकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. ओलितासाठी ठिबक पद्धतीचा अवलंब केल्यास पाण्याची बचत होते. जमिनीच्या पोताप्रमाणे पाण्याच्या पाळ्या द्याव्यात.
- वाफ्याला आच्छादित करणे : वाफ्यातील ओलावा टिकविण्यासाठी ६ सें.मी. जाडीचा गवताचा थर देऊन आच्छादित करावा. त्यामुळे ओलावा टिकून राहतो व फळांची गळ कमी होते. तसेच जमिनीतील जिवाणू सक्रिय होऊन अन्नद्रव्य मुळांना सहज उपलब्ध होते.

संत्रा बहाराची निगा राखणे...

बहार आल्यानंतर सर्वच फुलांचे फळात रूपांतर होत नाही. बहारामध्ये बरीच फुले नर फुले असतात. त्यामुळे ही नर फुले गळून पडतात. त्यामध्ये फलन क्रिया होत नाही. सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता, संजीवकांचा अभाव, हवामानाचा असमतोलपणा आणि किडींचा उपद्रव यामुळे फळांची गळ होते. सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता भरून काढण्यासाठी झिंक सल्फेट, कॉपर सल्फेट, मॅगनिज सल्फेट आणि फेरस सल्फेट यांची २ ग्रॅम प्रति लिटर पाण्यातून फवारणी करावी. संजीवकांचा समतोल साधण्यासाठी १० पीपीएम (१ ग्रॅम नॅपथिल ॲसेटिट ॲसिड १०० लिटर पाण्यात) मार्च मार्च महिन्यात फवारणी करावी. या बहारावर 'सिट्रस सायला' नावाच्या किडीचा प्रादुर्भाव असतो. यासाठी क्लोरपायरीफॉस १ मिलि १ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

संत्रा-मोसंबीचा आंबिया बहार

थंडीच्या काळातील कमी तापमानामुळे निसर्गतः संत्रा-मोसंबीची झाडे विश्रांती घेतात. या काळातील वातावरण पोषक नसल्यामुळे झाडांवर नवीन वाढ होत नाही. या विश्रांतीच्या काळात अतिरिक्त साखरेचा संचय झाडाच्या ६ ते ९ महिन्यांच्या फांद्यांमध्ये होतो. हवामान अनुकूल झाल्यावर झाडावर फुले येण्यास याचा उपयोग होतो. संत्रा-मोसंबीच्या आंबिया बहाराला नैसर्गिक बहार म्हणतात. या बहारामध्ये संत्रा- मोसंबी झाडाची वाढ कडाक्याच्या थंडीत थांबते. डिसेंबरचा दुसरा ते जानेवारीचा दुसरा आठवडा या एका महिन्याच्या कालावधीत रात्रीचे किमान तापमान साधरणतः १० अंश सेल्सिअसच्या खाली राहते. एवढ्या कमी तापमानावर झाडांना ताण बसतो. या ताणामुळे झाडे खराब होत नाही.

शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी..!

आपल्याकडे 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' असे संतवचन आहे. शेतीसाठी शुद्ध बीज अत्यंत महत्त्वाचे असून, शेतकऱ्यांची चांगल्या वाणाचे शुद्ध बियाणे मिळवण्याची नेहमीच धडपड असते. हंगामाच्या सुरुवातीला नेहमीच बियाण्यांची मागणी वाढत असल्याने भेसळ, कमी आनुवंशिकता शुद्धता असलेल्या व कमी दर्जाच्या बियाण्यांना पेव फुटते. क्वचित फसवणूकही होते. वापरात येणारे सर्व बियाणे हे मागील वर्षी तयार केलेले असते. त्याची साठवणूक योग्य पद्धतीने केलेली नसल्यास बियांची उगवणक्षमताही कमी होते. हे सर्व प्रकार टाळण्यासाठी शुद्ध बियाण्यांचे प्रकार व साठवण्याची पद्धती शेतकऱ्यांनी जाणून घेणे गरजेचे आहे.

वापरात येणारे सर्व बियाणे हे मागील वर्षी तयार केलेले असते. त्याची साठवणूक योग्य पद्धतीने केलेली नसल्यास बियांची उगवणक्षमताही कमी होते. हे सर्व प्रकार टाळण्यासाठी शुद्ध बियाण्यांचे प्रकार व साठवण्याची पद्धती शेतकऱ्यांनी जाणून घेणे गरजेचे आहे...





बीज पैदास प्रक्रिया

पैदास प्रक्रियेतून पिकांच्या सुधारित व अधिक उत्पादनक्षम जाती विकसित केल्या जातात. अशा सुधारित जातीपासून बीजनिर्मिती करतात व त्याची तपासणी करून गुणन केले जाते. हे बीज पुढे शेतकऱ्यांना लागवडीसाठी उपलब्ध होते. स्वपरागीत पिकांचे सुधारित बियाणे शेतकरी २ ते ३ वर्षे पुन्हा पुन्हा वापरू शकतो. संश्लेषित व संयुक्त वाणांचे बियाणे २ वर्षे, तर संकरित वाणांचे बियाणे फक्त एकदाच वापरता येते. असे असले तरी कोणतेही धान्य, घरगुती उत्पादन बियाणे वापरता येईलच असे नाही. कारण बियाण्यांची आनुवंशिक शुद्धता व उत्पादनक्षमता, बियाण्यांची उगवणशक्ती, अन्य गुणधर्म यांची खात्री देता येत नाही. दर हंगामात सुधारित वाणांच्या शुद्ध बियाण्यांची उपलब्धता होण्यासाठी प्रमाणित बियाणे दरवर्षी मोठ्या प्रमाणावर तयार करावे लागते. बियाण्याची ही गरज भागवण्यासाठी देशातील कृषी विद्यापीठे, संशोधन संस्था नवीन वाणांची निर्मिती, त्यांच्या उत्पादनक्षमतेच्या व व्यापारी गुणधर्माच्या चाचण्या दरवर्षी सतत घेत असतात. देशातील राष्ट्रीय बियाणे महामंडळ, राज्यातील बियाणे महामंडळे तसेच अनेक बियाणे निर्माण करणाऱ्या कंपन्या, सहकारी संस्था व शेतकरी बियाणे निर्मितीच्या कामात सहभागी होतात. राज्यातील बीज प्रमाणीकरण यंत्रणा लागवड, उत्पादन व प्रक्रिया या काळात बियाण्यांच्या शुद्धतेची व दर्जाची देखरेख करून काळजी घेते. बियाणे चाचणी प्रयोगशाळा उगवणशक्ती व शुद्धतेची तपासणी करतात. सर्व चाचण्या पूर्ण झाल्यावर बियाणे विक्रीसाठी योग्य ठरते. अशा बियाण्यांचा दर्जा व गुणवत्ता शेतकरी बियाणे खरेदी करेपर्यंत व नंतरही बियाण्याच्या लेबलवर लिहिल्याप्रमाणे आहे, याची तपासणी राज्यातील बियाणे गुणवत्ता नियंत्रण यंत्रणा सातत्याने करते.

बॅगवरील खूणचिट्ठी

अधिसूचित जातीच्या बियाण्याची विक्री करताना बियाण्याच्या बॅगवर बियाणे कायद्यामध्ये निर्देशित केलेल्या बियाणे प्रतीच्या कमीत कमी मूल्याच्या दर्जा दाखवणारी माहिती टॅग असणे आवश्यक आहे. बियाणे प्रकारानुसार योग्य त्या रंगाचा प्रमाणित टॅग असावा. उदा. पायाभूत बियाण्यासाठी पांढरा, प्रमाणित बियाण्यासाठी निळा, मूलभूत बियाण्यासाठी पिवळ्या रंगाचा, तर सत्यप्रत बियाण्यासाठी हिरव्या रंगाचा टॅग असतो. त्यावर ही माहिती असावी : १) पिकाचे नाव, २) जाती आणि प्रकार, ३) गट क्रमांक, ४) बीज परीक्षणाची तारीख, ५) उगवणशक्ती (टक्के), ६) शुद्धतेचे प्रमाण, ७) पिशवीतील बियाण्याचे एकूण वजन, ८) बियाण्याचा वर्ग, ९) बियाण्याचा सार्थ कालावधी, १०) विक्रेत्याचे नाव आणि पत्ता, ११) बियाणे प्रमाणित करणाऱ्या अधिकाऱ्यांची सही आणि हुद्दा आदी. याशिवाय बियाण्यास कीड किंवा रोग प्रतिबंधक कीटकनाशकाची प्रक्रिया केली असल्यास त्याचा उल्लेख आणि नावे टॅगवर असावीत. कीडनाशकाची नावे ठळक अक्षरात आणि माणसे, जनावरे, पक्षी यांच्या खाण्यास अयोग्य असा खुलासा त्यात असला पाहिजे.



बियाण्याचे प्रकार

पीक पैदासकारांनी विकसित केलेले नवे संकरित अथवा सुधारित वाण शेतकऱ्यांपर्यंत शुद्ध आणि चांगल्या स्थितीत पोहोचविण्यासाठी त्यांचे बीजोत्पादन शास्त्रीयदृष्ट्या चार टप्प्यांत घेतले जाते. यात १) मूलभूत बियाणे (न्युक्लिअस सीड), २) पैदासकार बीजोत्पादन, ३) पायाभूत बीजोत्पादन, ४) प्रमाणित बीजोत्पादन, ५) सत्यप्रत बीजोत्पादन असे टप्पे आहेत. यालाच बियाण्याचे प्रकार असेही म्हणतात.

- मूलभूत बियाणे (न्यूक्लिअस सीड) : पैदासकार बियाण्यांची लागवड करून मिळवलेल्या बियाण्यास मूलभूत बियाणे असे म्हणतात. त्याचे उत्पादन संशोधन केंद्रावर व कृषी विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर देखरेखीखाली केले जाते. पिकांची पाहणी करून भेसळीची रोपे काढून टाकली जातात. नंतर या पिकाची कापणी करून मिळणारे बियाणे पायाभूत बियाणेनिर्मितीसाठी वापरले जाते. अशा बियाण्यासाठी शक्यतो कुठल्याही प्रकारचे लेबल दिले जात नाहीत.
- पैदासकार बियाणे (Breeder seed) : पीक पैदासकाराने नवीन वाण विकसित केल्यानंतर त्यांच्याच देखरेखीखाली पैदासकार बीजोत्पादन घेतले जाते, यामुळे बियाण्यात कोणत्याही प्रकारची आनुवंशिक अथवा भौतिक प्रकारची भेसळ होत नाही. पैदासकार बियाण्याची शुद्धता १०० टक्के असते. पैदासकार बीजोत्पादन कृषी विद्यापीठे, शासकीय संस्था या ठिकाणीच घेतले जाते. मूलभूत बिजोत्पादन प्रक्षेत्राचे परीक्षण हे त्या पीक पैदासकाराकडूनच केले जाते. पैदासकार बियाणे प्रक्रिया करून तयार झाल्यानंतर या बियाण्याच्या पिशव्यांना पिवळ्या रंगाची खुणचिठ्ठी (टॅग) लावतात. या टॅगवर बियाण्याची उगवणक्षमता, भौतिक शुद्धता, बियाणे उत्पादनाचा हंगाम, वर्ष याबद्दल माहिती दिलेली असते. तसेच रोप पैदासकाराची सही असते. पैदासकार बियाणे हे पायाभूत बीजोत्पादनासाठी वापरतात.
- पायाभूत बियाणे (Foundation seed) : पायाभूत बियाणे हे पैदासकार बियाण्यापासून तयार केले जाते. पायाभूत बीजोत्पादन करताना बीजोत्पादनाची जास्तीत जास्त शुद्धता कशी राखली जाईल हे पाहिले जाते. पायाभूत बीजोत्पादन हे प्रामुख्याने कृषी विद्यापीठ अथवा सहकारी प्रक्षेत्रावर अथवा बियाणे महामंडळातर्फे प्रगतिशील शेतकऱ्यांच्या शेतावर घेतले जाते. पायाभूत बीजोत्पादनाची पाहणी बीज प्रमाणीकरण यंत्रणेने गठित केलेल्या अधिकाऱ्यांच्या समितीच्या देखरेखीखाली केली जाते. यामध्ये कृषी विद्यापीठाचे पीक पैदासकार, बियाणे महामंडळाचे प्रतिनिधी,



बीज प्रमाणीकरण यंत्रणेचे अधिकारी यांचा समावेश असतो. प्रक्रिया करून तयार झालेल्या पायाभूत बियाण्याच्या पिशव्यांना पांढऱ्या रंगाची खूणचिठ्ठी (टॅग) लावतात. यावर बियाण्याची उगवणक्षमता, आनुवंशिक शुद्धता, शुद्धता याची माहिती दिलेली असते. या टॅगवर बीज प्रमाणीकरण अधिकाऱ्याची सही असते.
- प्रमाणित बियाणे (Certified seed) : प्रमाणित बियाणे हे पायाभूत बियाण्यापासून तयार करतात. प्रमाणित बियाण्यामध्ये प्रमाणीकरण यंत्रणेच्या निर्धारित प्रमाणकानुसार आनुवंशिक आणि भौतिक शुद्धता राखली जाते. या प्रकारचे बिजोत्पादन शेतकरी स्वतःच्या शेतावर घेऊ शकतात. बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडून शेतकऱ्यांना हे बियाणे प्रमाणित करून घ्यावे लागते. यासाठी पेरणीनंतर १५ दिवसाच्या आत जिल्हा प्रमाणीकरण यंत्रणेकडे बीजोत्पादन क्षेत्राची नोंदणी करणे आवश्यक असते. बीजोत्पादन निर्धारित प्रमाणकानुसार घ्यावे लागते. यामध्ये प्रामुख्याने वापरण्यात येणारे बियाणे, विलगीकरण अंतर, भेसळ काढणे या गोष्टींचा समावेश होतो. प्रमाणीकरण यंत्रणेकडून या बीजोत्पादन क्षेत्राची पाहणी केली जाते. प्रक्रिया करून तयार झालेल्या प्रमाणित या बियाण्याच्या पिशव्यांना निळ्या रंगाची खूणचिठ्ठी (टॅग) लावतात. यावर बियाण्याची आनुवंशिक शुद्धता, भौतिक शुद्धता, उगवणक्षमता, तपासणी तारीख इ. माहिती दिलेली असते. यावर बीज प्रमाणीकरण अधिकाऱ्यांची सही असते.
- सत्यप्रत बियाणे (Truthful seed) : सत्यप्रत बियाण्याची आनुवंशिक शुद्धता, उगवणक्षमता, भौतिक शुद्धता प्रमाणित बियाण्याइतकीच असते. याचे उत्पादनही प्रमाणित बियाण्यासाठी असलेल्या प्रमाणके, मापदंडाप्रमाणे केले जाते. मात्र त्याची पाहणी ही बीजप्रमाणीकरण यंत्रणेकडून केली जात नाही. या प्रकारच्या बियाण्याच्या गुणवत्तेची खात्री ही उत्पादकानेच घ्यावयाची असते. प्रक्रिया करून तयार झालेल्या बियाण्याच्या पिशव्यांना हिरव्या रंगाची खूणचिठ्ठी (टॅग) लावतात. यावरसुद्धा इतर बियाण्याप्रमाणे माहिती दिलेली असते.



फळे, भाजीपाला प्रक्रियेची तत्त्वे...

फळे, भाजीपाला व प्रक्रिया पदार्थ अधिक काळ साठवण्यासाठी त्यावर परिणाम करणाऱ्या विविध जिवाणूंना रोखणे आवश्यक ठरते. असे पदार्थ खराब होण्यास कारणीभूत असणाऱ्या जिवाणूंची वाढ रोखणे, त्यावर मर्यादा घालणे यासाठी विविध तत्त्वांचा वापर केला जातो...

उत्पादित झालेल्या फळे, भाज्या यांच्या साठवणीसाठी पारंपरिक काळापासून अनेक पद्धतींचा अवलंब केला जातो. पदार्थ वाळवणे, खारवणे या बाबी आपल्याला माहीत असतात. या अनुभवजन्य प्रक्रियांचा सातत्याने विकास होत गेला आहे. पदार्थांच्या तात्पुरत्या साठवणीसाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धतींची काही मूलतत्त्वे आहेत.पदार्थ खराब होण्यासाठी त्यामध्ये वाढणारे सूक्ष्मजीव कारणीभूत असतात. हे सूक्ष्मजीव काही प्रमाणात मारले किंवा निष्क्रिय केले जातात. या पद्धतीस 'तात्पुरते संस्करण' असे म्हणतात. तात्पुरत्या संस्करण पद्धतींना 'भौतिक पद्धती' असेही म्हणतात. सूक्ष्म जीवांचा या पद्धतीमध्ये पूर्णपणे नाश होत नाही. विशिष्ट काळासाठी सूक्ष्मजीवांची वाढ थांबवण्याची प्रक्रिया पदार्थांवर केली जाते. अनेक उद्योगसमूहात भौतिक पद्धतींचा वापर केला जात असला तरी मर्यादित काळासाठी साठवणूक करण्यासाठी या पद्धती वापरता येतात. उदा. असेप्सिस, कमी तापमानाचा वापर व निर्जंतुक करणे, निर्जलीकरण (वाळविणे) आदी.



कमी तापमानाचा वापर...

फळे व भाजीपाल्यातील जैविक व रासायनिक क्रिया वातावरणातील तापमानाशी संबंधित असतात. कमी तापमानातील साठवणुकीत पदार्थांतील सूक्ष्म जिवाणूंची वाढ व विकासाच्या क्रिया मंदावतात किंवा थांबतात. परिणामी फळे,भाज्या व प्रक्रियायुक्त पदार्थांचा साठवण काळ वाढतो...

- शीतकरण : पदार्थ शीतकपाटात (फ्रिज) ठेवून त्यामधील ऑक्सिडीकरण व पाणी कमी होण्याची गती कमी केली जाते, यालाच 'शीतकरण' असे म्हणतात. फळे व भाज्या शीतकपाटात ठेवून त्यांचे आयुष्यमान वाढविणे ही सर्वपरिचित व मोठ्या प्रमाणात वापरली जाणारी पद्धत आहे. कमी तापमानास सूक्ष्मजीव नष्ट होत नसले तरी त्यांची वाढ व हालचाल नियंत्रित करता येते. शीतकपाटातील साठवणुकीमध्ये आतील तापमान, आर्द्रता योग्य ठेवली जाते. या दोन्ही गोष्टीसोबतच फळे व भाज्यांच्या प्रकारावर साठवण कालावधी अवलंबून असतो. शीतकपाटानध्ये प्रामुख्याने दोन भाग असतात. एकामध्ये शून्य अंश सेल्सिअस (गोठवण) तापमान असते, तर दुसऱ्या भागामध्ये सुमारे १० अंश सेल्सिअसपर्यंत तापमान ठेवतात.
- गोठवणे : या पद्धतीमध्ये पदार्थ शून्य अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा कमी तापमानाला गोठवून साठविला जातो. परिणामी पदार्थांतील बहुतांश सर्व सूक्ष्मजीवांची वाढ, विकास, सक्रियता यावर नियंत्रण मिळवता येते. ज्या पदार्थांना उष्णता दिल्यानंतर त्यातील गंध किंवा स्वाद कमी होतो, अशा पदार्थांसाठी गोठवण पद्धती अधिक उपयुक्त ठरते. तसेच फळांचे शुद्ध रस व साखरेचे प्रमाण जास्त असणारे पदार्थ साठविण्यासाठी या पद्धतीचा वापर केला जातो.
- प्रक्रिया : गोठवणीपूर्वी फळे व भाज्या स्वच्छ धुऊन घ्याव्यात. त्यांच्या प्रकारानुसार योग्य आकाराचे काप करून किंवा आहे त्या स्थितीत त्यांच्यावर गरम पाण्याची प्रक्रिया (ब्लांचिंग) करावी. अशी फळे व भाज्या काही सेकंद थंड पाण्यात बुडवून काढावीत. थंड पाण्यातून काढल्यानंतर, कोरडे करून योग्य पॅकिंगमध्ये सीलबंद करावीत. अशा सीलबंद फळे, भाज्या व प्रक्रियायुक्त पदार्थ गोठवून साठविता येतात. उदा. स्ट्रॉबेरी काप, आंब्याचा रस व वाटाणा.

प्रादुर्भाव टाळण्यासाठी उपाययोजना...

असेप्सिस पद्धतीमध्ये जीवजंतू फळे, भाज्या व प्रक्रियायुक्त पदार्थांपासून दूर ठेवण्याचा मार्ग अवलंबिला जातो. पदार्थांमध्ये शिरकाव झाल्यानंतर सूक्ष्म जीवजंतूंना बाहेर काढण्याचे प्रयत्न करण्यापेक्षा त्यांचा प्रादुर्भाव पदार्थांमध्ये होऊ नये, याची काळजी घेतली जाते. सुरुवातीला फळे, भाज्या स्वच्छ धुऊन घ्याव्यात. फळे व भाज्यांचा खराब भाग निर्जंतुक चाकूने काढून टाकला जातो. प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करताना निर्जंतुक वातावरण निर्मिती केली जाते. हाताळणी करण्यापूर्वी हात व अवजारे स्वच्छ धुवून निर्जंतुक केली जातात. पदार्थ निर्मितीसाठी वापरले जाणारे पाणी व साहित्य निर्जंतुक करून वापरले जाते. अशा गोष्टींमुळे प्रक्रियायुक्त पदार्थांस अन्न खराब करणाऱ्या सूक्ष्म जीवाणूंचा प्रादुर्भाव होत नाही. यामुळे पदार्थांचा साठवण काळ वाढतो.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा निकाल जाहीर

धीरज देशमुखांच्या सहकार पॅनला स्पष्ट बहुमत



लातूर (प्रतिनिधी)– लातूर जिल्हा बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीच्या निकालासंदर्भात एक मोठी अपडेट समोर आली आहे. लातूर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत १४ जागी काँग्रेस नेते धीरज देशमुखांचे सहकार पॅनल विजयी झालं आहे. तर पाच जागेवर भाजपच्या परिवर्तन पॅनलने विजय मिळवला आहे. काँग्रेस नेते धीरज देशमुखांचं सहकार पॅनल जरी सत्तेत आलं असले तरी भाजपची या निवडणुकीच्या निकालातील जोरदार मुसंडी दिसून आलीय.

दरम्यान, सर्वांचं लक्ष लागून राहिलेल्या निलंगा येथून भाजप नेते संभाजी पाटील निलंगेकर यांचे बंधू आणि परिवर्तन पॅनलचे उमेदवार अरविंद पाटील निलंगेकर यांनी मोठा विजय मिळवला आहे. अरविंद पाटील निलंगेकर यांनी त्यांच्या काकी संगीता अशोक पाटील निलंगेकर यांचा पराभव करत पहिल्यांदाच लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये प्रवेश केला आहे.

दरम्यान, १९ जागे पैकी १४ ठिकाणी काँग्रेसच्या सहकार पॅनलने विजय मिळवला आहे. पाच ठिकाणी परिवर्तन पॅनल विजय मिळवला आहे. यात संभाजी पाटील निलंगेकर यांचे बंधू अरविंद पाटील निलंगेकर विजयी झाले आहेत. तर त्यांनी त्यांची काकी संगीता अशोक पाटील निलंगेकर यांचा पराभव केलाय. तर यात भाजपचे आमदार रमेश कराड यांचे चिरंजीव ऋषिकेश कराड हे विजयी झाले आहेत. त्यांनी काँग्रेसचे अशोक गोविंदपुरकर यांचा पराभव केला आहे. सोबतच सहकार पॅनलचे धीरज देशमुख विजय झाले आहेत. स्वर्गीय माजी आमदार चंद्रशेखर भोसले यांच्या कन्या प्रीती भोसले या विजयी झाल्या आहेत. सहकार पॅनलकडून त्यांनी निवडणूक लढवली होती. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे जावई हेमंत जाधव हे सहकार पॅनल मधून विजय झाले आहे.

दरम्यान, मत्स्य आणि हाउसिंग मतदारसंघातून सहकार पॅनलचे जयेश विश्वंभर माने विजयी झाले आहे. ४५ पैकी ३५ मतं मिळवत जयेश विश्वंभर माने यांनी विजय मिळवला आहे. सोबतच परिवर्तन पॅनलचे भगवानदादा पाटील पटवारी हे देखील विजयी झाले आहे. तर दुसरीकडे उदगीर सोसायटी मतदारसंघातून सहकार पॅनलच्या प्रीती चंद्रशेखर भोसले यांनी १० मतांनी विजयी गुलाल उधळला आहे. तर सहकार पॅनलचे संतोष पाटील हे देखील या निवडणुकीत विजयी झाले आहेत.

दिवंगत मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचा बालेकिल्ला असलेल्या लातूरमधील जिल्हा बँकेची निवडणुकीच्या निकालाकडे अवघ्या राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलं होतं. जिल्हा बँकेतील संचालकांच्या १५ जागांसाठी झालेल्या निवडणुकीसाठी ९९.४ टक्के मतदान झालं होतं. येथे ९९९ पैकी ९९३ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला असता, या मतदानाची मतमोजणी आज होत आहे. जिल्हा बँकेच्या या निवडणुकीत महाविकास आघाडीचे सहकार पॅनेल आणि महायुतीचे परिवर्तन पॅनेल यांच्यात थेट लढत होत आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने काँग्रेस नेते धीरज देशमुख आणि भाजप नेते तथा माजी मंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांची प्रतिष्ठा पणाला लागली असताना अरविंद पाटील निलंगेकर यांनी त्यांच्या काकी संगीता अशोक पाटील निलंगेकर यांचा पराभव करत पहिल्यांदाच लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये प्रवेश केला आहे.

अमित शाहांच्या हस्ते पुण्यात अजित पवारांच्या पुतळ्याचं अनावरण



पुणे (प्रतिनिधी)– राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याहस्ते संपन्न झाले. या सोहळ्यात सर्वच मान्यवरांनी अजित पवारांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या कार्याची आणि पुणे, पिंपरी चिंचवडवरील प्रेमाची आठवण सांगितली. तर, अमित शाह यांनी अजित पवारांच्या आठवणी सांगताना अनेक किस्से सांगितले. जे पटलं ते होय आणि जे नाही पटलं ते नाही असे परखडपणे बोलणारे अजित पवार होते. महायुतीमधील जागांच्या वाटाघाटीवेळी ते आपलं मत स्पष्ट मांडायचे, होय तर होय किंवा नाही... दादांचा हा गुण आपल्याला खूप आवडायचा, असे अमित शाहांनी म्हटले. अमित शाहांच्या भाषणावेळी व्यासपीठ भावूक झाल्याचं दिसून आलं.

पुणे जिल्हा परिषदेच्या प्रवेशद्वाराजवळ आज दिवंगत अजित पवार यांच्या अर्धाकृती पुतळ्याचं अनावरण करण्यात आलं. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते पुतळ्याचं अनावरण पार पडलं. या सोहळ्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, कृषीमंत्री दत्ता भरणे, केंद्रीयमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, महापौर मंजुषा नागपुरे उपस्थित होते. शरद पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे देखील अजित पवार यांच्या अर्धाकृती पुतळ्याच्या अनावरणाच्या सोहळ्यासाठी उपस्थित होत्या.

अजित पवारांच्या कामाचा झपाटा, ग्रामीण महाराष्ट्राशी जोडलेली नाळ, आणि सहकार क्षेत्रातील त्यांच्या अनुभव, अभ्यासाच्या आठवणींना अनेक मान्यवरांनी आपल्या भाषणातून उजाळा दिला. तर, गृहमंत्री अमित शाह यांनीही दादांच्या आठवणी आणि त्यांच्यासमवेतचे किस्से सांगितले. महायुतीमध्ये सामील झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांसाठी, तळागाळातील कार्यकर्त्यांसाठी अजित दादांनी माझ्यासह देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यासोबत अनेकदा वाद घातले.

विहिरीच्या मोजमापासाठी उतरले, अचानक ढिगारा कोसळल्याने अडकले; २४ तासांनी ४ मजूरांचे मृतदेह सापडले



पंढरपूर (प्रतिनिधी)– सोलापूरच्या पंढरपूर तालुक्यातील आंबे गावात धक्कादायक घटना घडली. पूर्ण झालेल्या विहिरीचं मोजमाप सुरू असताना अचानक ढिगारा कोसळला. यात चार मजुरांचा मृत्यू झाला. गेल्या २४ तासांपासून एनडीआरएफकडून बचावकार्य सुरू होतं. अखेर आज सकाळी ११ वाजता चारही जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात NDRF टीमला यश मिळालं. शेतकरी निवास शिंदे यांच्या विहिरीचं काम पूर्ण झालं होतं. जवळपास ५० फूट खोलीच्या या विहिरीचं मोजमाप घेण्याचं काम सुरू असताना ही दुर्घटना घडली. सदर दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या मृतांच्या कुटुंबीयांना पाच लाखांची मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत जाहीर करण्यात आली आहे. तसेच बेकायदा विहीर खोदणे आणि धोकादायक ब्लास्टिंग याचीही चौकशी होणार असल्याची माहिती पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील आंबे गावातील शेतकरी निवास शिंदे यांच्या विहिरीत हे काम सुरू होते. पूर्ण झालेल्या विहिरीचे मोजमाप सुरू असताना अचानक विहिरीचा ढिगारा आणि कठडा कोसळला. या दुर्घटनेत ४ मजूर ढिगाऱ्याखाली अडकले होते. तर दोन मजूर आंबे गावचे आणि दोन आणवलीचे होते. या घटनेत चारही मजूरांचा मृत्यू झाला आहे. शेतात जेसीबीच्या साहाय्याने विहीर खोदण्याचे काम सुरू असताना काल सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली. यामध्ये मंगेश मोरे (वय ३५), सिद्धेश्वर घाडगे (वय ४५), आबासाहेब घोडके (वय ५०) आणि तानाजी घोडके (वय ५४) हे चार कामगार ढिगाऱ्याखाली अडकले. या दुर्घटनेतील दोन मजूरांना सुरुवातीला ढिगाऱ्याखालून बाहेर काढण्यात यश आले होते. त्यानंतर पहाटेच्या सुमारास एक, त्यानंतर सकाळी १० आणि ११ वाजताच्या सुमारास उरलेल्या दोन मजूरांना ढिगाऱ्यातून बाहेर काढण्यात एनडीआरएफ टीमला यश मिळाले.

Change In Name

My old name is **ANIL LINGAPPA DONGASHANWAR.** Which now I am Changing as New Name: **ANIL LINGAPPA DONGSHANWAR** Hence, forth my all correspondence. Will be done as per my New Name. Please consider, the same.

Address :- S/o Anil dongashanwar,00, kasar Galli Bhokar Nanded Maharashtra-431801 Mob. 9158531391

Change In Name

My old Name is **ZAHEDA BEGUM** Which now I am Changing as New Name **ZAHEDA BEGUM SHAIKH RASHEED** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name.

Address: H.No. 1-13-986, Kasim Villa, Peer Nagar, Nanded- 431605

Change In Name

My old Name is **Shaikh Nuzhat Aslam** Which now I am Changing as New Name **Shaikh Nuzahat Shaikh Aslam.** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: Amina Manzil Lalwandi Road Naigaon Mo. No. 9545933401

Change In Name

I have changed my name from (old name) **Md Rafi Mohammad Ramzan** to (newname) **Mohammad Rafi Mohammad Ramzan.**

So, from now consider my name As Mohammad Rafi Mohammad Ramzan and I am solely responsible for its accuracy.

- Address-
1/17/1834, Hazarat Pirburhan Nagar Galli No.19, Be Side Madina Kirana Taroda BK Dist. Nanded: 431605

Change In Name

MY OLD NAME IS. ZAFARKHAN NOW I AM CHANGING AS A NEW NAME JAFFAR KHAN PATEL HEANCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME PLEASE KINDLY CONSIDER THE SAME. FULL ADDRESS. PLOT NO 4, NEAR SANA HIGH SCHOOL NOMANIYA NAGAR CHAITANYA NAGAR POST TARODA BK NANDED MS 431605 MOB.NO.8668476921.

जा.क्र.नांवाशमनपा/उद्यान/9867/2026
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
दि. 11 6 NOV 2026

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
(उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग)

'झाडांना खिळे ठोकणे, झाडांवर पोस्टर्स/भित्तीपत्रके व जाहिराती लावणे, झाडांवर विद्युत रोषणाई करणे व विद्युपीकरणास प्रतिबंध करणेबाबत जाहीर प्रगटन'

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आलेली आहे. काही व्यावसायिक हे त्यांच्या व्यवसायाची जाहिरात व्हावी या हेतुने मुख्यत्वे रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडांना खिळे ठोकुन जाहिराती लावतात. तसेच पोस्टर, भित्तीपत्रके इत्याादीद्वारे जाहिराती चिकटवतात. तसेच त्यांच्या दुकाना समोरील झाडांवर विद्युत रोषणाई करतात. यामुळे झाडांना इजा पोहचत असून झाडांवरील सजीवांवर त्याचा दुष्परिणाम होतो. तसेच शहराच्या सौंदर्यास बाधा पोहचून शहराचे विद्युपीकरण होऊन पर्यावरणास हानी पोहचते.

करीता याद्वारे सर्व संबंधितांना जाहिर आवाहन करण्यात येते की, ज्यांनी झाडांवर पोस्टर्स/भित्तीपत्रके व जाहिराती इ. साहित्य झाडांवर खिळे ठोकुन जाहिराती लावल्या असल्यास, तसेच झाडांवर विद्युत रोषणाई केली असल्यास सदरचे जाहीर पगटन प्रसिध्द झाले पासून 07 दिवसांचे आत काढुन घेण्यात यावे. या कालावधीनंतर जाहिराती आढळुन आल्यास संबंधितांवर "महाराष्ट्र मालमतेच्या विरुपणास प्रतिबंध अधिनियम 1995" अन्वये गुन्हा दाखल करण्यात येईल. तसेच महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम1975 चे कलम 21(1) अन्वये कार्यवाही करण्यात येईल. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

अतिरीक्त आयुक्त (1)
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

जाहीर प्रगटन

मौजे वसरणी ता.जि. नांदेड मनपा हद्दीतील गट नं. २७/२ प्लॉट नं. १५ चा पूर्वेकडील भाग ज्याची लांबी दक्षिण-उत्तर : ४० फुट म्हणजे १२.१९ मीटर व रूंदी पूर्व-पश्चिम : १५ फुट म्हणजे ४.५७ मीटर ज्याचे एकूण क्षेत्रफळ ६०० चौ.फुट म्हणजे ५५.७६ चौरस मीटरचा प्लॉट सौ. जोत्सना जेजेराव वाघमारे रा. येवती ता. मुखेड जि. नांदेड यांचेकडून मनोहर ग्यानोबा कांबळे रा. कापसी (खु.) ता. लोहा जि. नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चतुःसिमा- पूर्वेस - प्लॉट नं. १६, पश्चिमेस - सदरील प्लॉटचा उर्वरीत भाग, दक्षिणेस - प्लॉट नं. ७ व उत्तरेस - २० फुट रूंद रोड.

तरी वरील चतुःसिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत मनोहर ग्यानोबा कांबळे यांच्या नावे करून घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन.

जाहीर प्रगटन देणार
मनोहर ग्यानोबा कांबळे
रा. कापसी (खु.) ता. लोहा जि. नांदेड
मो.नं. ८००७२२७०४

Change In Name

I have changed my name from (old name) **Md Tauseef Md Rafi** to (newname) **Md Tauseef Mohammad Rafi.**

So, from now consider my name As Md Tauseef Mohammad Rafi and I am solely responsible for its accuracy.

- Address -
1/17/1834, Hazarat Peer Burhan Nagar Galli No.19, Taroda Bk, Dist. Nanded: 431605

Change In Name

My old name is **RAJAM SHOBA** which I am changing as New name **RAJAM SHOBHA**. Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.

Cantact - RAJAM SHOBHA

Address- House No. 12-03-548/1, Laxmi Compound, Near Jain Temple, Taroda Khurd,Malegaon Road, Nanded 431605 Cell: 9403520062

जाहिर प्रगटन

सर्व जनतेस व हित संबंधीतांना सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकार नामे 1) विजय पि. विठ्ठलराव मंडलापुरे वय : 32 वर्ष, धंदा : शेती, रा. ताकवीड, ता. नायगांव (खै.) जि. नांदेड, 2) श्री. राहुल पि. गणपतराव गायकवाड, वय : 35 वर्ष, धंदा : शेती व सामाजिक कार्य, रा. धनश्री कॉलनी, तरोडा (बु.) नांदेड ता. जि. नांदेड, 3) प्रियंका पि. धोंडीबा मोरे, वय : 32 वर्ष, धंदा : घरकाम रा. रेणापुर ता. भोकर जि. नांदेड यांनी मला दिलेल्या माहिती व अधिकारा प्रमाणे खालीलप्रमाणे जाहिर प्रगटन देण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी श्री. संजय पि. गिरमाजी आरळे (गडगेकर), वय : 52 वर्ष, धंदा : शेती, रा. टाकळगांव पो. देगांव, ता. नायगांव (खै.) जि. नांदेड यांच्या मयत वडिलांच्या मालकी व ताब्यातील त्यांना वाटी-वारसा आधारे मिळालेली स्थित संपत्ती वसंतनगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित (अस्तुलखाबाद) नांदेड ता. जि. नांदेड या संस्थेतील प्लॉट नं. 91 हा सर्व्हे नं. 42 बी व 29/ए हा आहे. सदरील मिळकत ही सौदाचिठ्ठी लिहून देणार यांचे मयत वडिल गिरमाजी पि. सिद्राम आरळे (गडगेकर) यांची स्वकष्टीत आहे. यांच्या कुटुंबातील कर्ता पुरुष म्हणुन त्यांच्या रक्तसंबंधीत नातेवाईकांच्या संमतीने हि संपत्ती आमचे पक्षकारास कायमस्वरुपी विक्री करण्याचा करारनामा (सौदाचिठ्ठी) हि दिनांक 06/11/2026 रोजी नोंदणीकृत नोटरी हि 500/- रु. किंमतीच्या मुद्रांकावर आमच्या पक्षकाराच्या हक्कात करुन दिली आहे. सदरील मिळकतीची साईज 50 x 72 असून, ज्याचे एकुण क्षेत्रफळ 3600 चौ. फुट आहे. या मिळकतीच्या चर्तु:सिमा जसे की, पुर्वेस : श्री. पांडे यांचे घर, पश्चिमेस : श्री. जाधव यांचे घर, दक्षिणेस : श्री. भरताने यांचे घर व उत्तरेस : सार्वजनिक रस्ता आहे. या मिळकतीची सौदाचिठ्ठी आमचे पक्षकाराने एकुण ठरलेल्या किंमती पैकी इसारा / बयाना रक्कम म्हणुन संबंधीतास BOI शाखा नायगांव (खै.) या बँकेचा धनादेश क्र. 091164 याचा 25,00,000/- चा धनादेश दिला आहे. उर्वरीत रक्कम ही सौदाचिठ्ठी / करारनामा लिहून देणार यांच्या नांवे उपरोक्त नमुद मिळकतीचा संबंधीत कार्यालयात नांव परिवर्तनाची योग्य ती कायदेशीर कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर खरेदीखताच्या वेळी देवून नोंदणीकृत दस्त संबंधीत कार्यालयात वर नमुद नावा प्रमाणे आमचे पक्षकार करुन घेणार आहेत असे पंचासमक्ष ठरले आहे.

तरी सदर करारा बाबत व सदरील मिळकती बाबत कोणाचा काही हितसंबंध, उजर, आक्षेप, गहाणखत, लिज, कोणत्याही प्रकारची देवाण-घेवाण असल्यास त्यास आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून 07 दिवासाच्या आत मुळ कागदपत्रासह खालील पत्यावर संपर्क साधावा. सदर मुदतीच्या नंतर आलेले आक्षेप ग्राह्य धरण्यात येणार नाहीत व त्यानंतर माझे पक्षकार नोंदणीकृत खरेदीखत / विक्रीखत करुन घेतील याची सर्व जनतेने नोंद घ्यावी. करीता हे जाहिर प्रगटन.

जाहिर प्रगटन देणार

मार्फत,
ॲड. प्रल्हाद व्ही. कांबळे
जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड.
मो.नं. 9850923253.

1) विजय पि. विठ्ठलराव मंडलापुर
मो. नं. 9175718084.
2) श्री. राहुल पि. गणपतराव गायकवाड
मो. नं. 9096555131.
3) प्रियंका पि. धोंडीबा मोरे

कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेंडन, लेब्रा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



:: जाहीर-प्रगटन ::

आम्ही जाहीर प्रगटन देणार यांनी लिहुन घेतले की, आम्ही जाहीर प्रगटन देणार की. इरफान खान पिता अहमद खान रा. गुलजार खान, गल्ली नंबर २, हैदरखान, नविद येथील रहिवासी असुन मी लिहुन देणार जाहीर प्रगटन देणार यांनी मालमत्ता मालक कुंवर अहमद पिता फत्तेम रा. हुंकार देळडी, तहसिल पीपे मालकी ताब्यातील व कब्जातील असलेले मौजे वाँदार तर्फे हवेली ता. जि. नांदेड येथील रीत गट नंबर ७२ मधील १० गुंठे क्षेत्र जमीन खरेदी बेसे असुन सौदाचिठ्ठी लिहुन घेतली आहे. तरी सदरील गट नंबर ७२ मौजे वाँदार तर्फे हवेली ता. जि. नांदेड शेत गट नंबर ७२ मधील १० गुंठे क्षेत्र जमीन असुन ज्याची चतुसिमा पुढील प्रमाणे आहे. पुर्वेस-मो. कुंवर मेा. अमदा यांचा उर्वरीत ७० हेक्टर १० आर रीत आहे. पश्चीमस- मो. फुस्रु ब. रजाक यांचे रीत आहे. दक्षिणेस पांदन रोड आहे. उत्तरेस- शिवाराम वामन शिंदे यांचे रीत आहे.

तरी वरील चतुसिमेच्या आतील जमीनाचे गट नंबर ७२ मधील १० गुंठे क्षेत्र जमीन मी जाहीर प्रगटन देणार यांनी कुंवर अहमद यांच्याकडुन खरेदी करण्याचा करार सौदाचिठ्ठी करुन काही रक्कम बयानापोटी दिली आहे. तसेच ठरलेली उर्वरीत रक्कम देवुन खिरीखत करुन घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरील जमिनी बाबत जर कोणीही काही केले-तोंपो, सौदाचिठ्ठी, करारनामा इत्यादी व्यवहार केलेले असतील तर संबंधीतांनी सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन आज दिवसाचे आत आम्च्याशी लेखी लाखुन आपले आक्षेप, उजर लेखी स्वरुपात कागदपत्र सहीत सादर करावे. यानंतर आलेले आक्षेप,उजर,दावा तरी जाहीर नाही याची नोंद घ्यावी.

जाहीरप्रगटनदेणार

इरफान अहेमद खान पिता अहेमद खान
रा. गुलजार खान,
मो. नं. ९०७७ ९८४०२११७७७.

जाहिर नोटीस

मा. श्रीमती हि. का. शेळके, धर्मादाय सह आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड. यांचे न्यायालयात
(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम-1950 चे कलम 36 (1)(a) अन्वये)
ऋत फांउडेशन,नांदेड ता.जि. नांदेड नों.क्र. एफ-8162 (नांदेड)
या न्यासाची स्थावर मिळकतीचे अदलाबदल(Exchange) करणेकरीता या कार्यालयात दाखल अर्ज क्र. 12/2026 कलम 36 (1)(a) प्रकरणाबाबत..

सर्व जनतेस कळविण्यात येते की, ऋत फांउडेशन,नांदेड ता. जि.नांदेड नों.क्र. एफ- 8162 (नांदेड) या न्यासाच्या मालकीचे मौजे कारेगाव ता.लोहा जि.नांदेड येथील गट नं.400 मधील 0.25 आर एवढी आणि गट नं.403 मधील 02.10 आर एवढी शेतजमीन ही श्री दशरथ बापूराव पाटील यांच्या मालकीच मौजे खडक मांजरी ता.लोहा जि.नांदेड येथील गट नं.176 मधील 01.58 आर एवढी शेतजमीनीसोबत अदलाबदल करण्याकरिता पुर्व मंजूरीसाठी या कार्यालयात चौ.क्र.12/2026 क.36 (1)(a) अन्वये प्रकरण दाखल असुन ते प्रलंबित आहे.

सदरील प्रस्ताव हा मा. धर्मादय सह आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड यांच्या कार्यालयात दाखल करण्यात आलेला असुन यात दि 22.10.2026 रोजी झालेल्या मा. धर्मादाय सह आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड यांचे आदेशान्वये प्रस्तावास कोणासही आक्षेप असल्यास संबंधित कागदपत्रासह लेखी स्वरूपात दि. 23.11.2026 पुर्वी नांदेड कार्यालयात सादर करावा.

आज दि.28.10.2026 रोजी माझे सहीनिशी व मा. धर्मादाय सह आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड यांच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

आदेशावरून.

(कर्ण डी.जी.)
शिरस्तेदार

अधिक्षक (न्याय)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग, नांदेड.

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर २०२६ पान ६

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308

दिवंगत पत्रकार गणेश कस्तुरे आणि प्रदीप वाकोडीकर यांना शोकसभेत श्रद्धांजली



नांदेड (प्रतिनिधी)– दिवंगत पत्रकार गणेश कस्तुरे आणि किनवटचे ज्येष्ठ पत्रकार प्रदीप वाकोडीकर यांच्या स्मृतींना उजाळा देत शोकसभेत त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी अनेक पत्रकारांसह विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते. त्याचबरोबर अमरावतीचे पोलीस आयुक्त डॉ. महेश पाटील यांचीही यावेळी विशेष उपस्थिती होती. दोन्ही पत्रकारांच्या पत्रकारितेतील योगदानासोबतच त्यांनी विविध क्षेत्रात दिलेल्या योगदानाला यावेळी उजाळा देण्यात आला.

गणेश कस्तुरे यांच्या पत्रकारितेतील धाडसाचा आणि बातमीचा पाठपुरावा करण्याच्या वृत्तीचा उल्लेख करताना पोलीस आयुक्त डॉ. महेश पाटील म्हणाले की, गणेश हा अभ्यासू, जिद्दी, मेहनती आणि बातमीचा शेवटपर्यंत पाठलाग करणारा पत्रकार होता. क्राइम रिपोर्टिंगमध्ये त्याने निर्माण केलेले संपर्कजाळे विलक्षण होते. अनेकदा एखादी घटना पोलिसांना कळण्यापूर्वीच गणेशला तिची माहिती मिळत असे. त्याने आपल्या कामातून विश्वासाचे मोठे नेटवर्क उभे केले होते. विकासात्मक आणि सकारात्मक पत्रकारितेचा तो मानबिंदू होता. त्याच्यासारखा दिलदार मित्र पुन्हा होणे नाही, अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. ज्येष्ठ पत्रकार प्रदीप वाकोडीकर यांच्या आठवणींनाही यावेळी उजाळा देण्यात आला. जुन्या जाणत्या पिढीतील निर्भीड, संयमी आणि अभ्यासू पत्रकार म्हणून वाकोडीकर यांची ओळख होती.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार संजीव कुलकर्णी, संपादक शंतनू डोईफोडे, ज्येष्ठ संपादक केशव घोणसे पाटील, संतोष पांडागळे, अनिल कसबे, प्रकाश कांबळे आदींनी या दोन्ही दिवंगत पत्रकारांच्या आठवणी जागवल्या. शोकसभेचे निवेदन राम तरटे यांनी केले. दिवंगत पत्रकार गणेश कस्तुरे आणि ज्येष्ठ पत्रकार प्रदीप वाकोडीकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी नांदेड शहरातील नाना-नानी पार्कमधील कै. सुधाकरराव डोईफोडे सभागृहात या शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.

संपादक अब्दुल सत्तार, ज्येष्ठ पत्रकार कालिदास जहागिरदार, प्रदीप नागापूरकर, देगलूरचे माजी नगराध्यक्ष तथा पत्रकार विवेक केरुरकर, अनुराग पोवळे, बजरंग शुक्ला, अभय कुळकजाईकर, गोविंद मुंडकर, माधव अटकोरे, प्रा. देविदास शिंदे, संग्राम मोरे, प्रल्हाद लोहेकर, प्रा. हामद आदींनी आपल्या श्रद्धांजलीपर भावना व्यक्त केल्या.

यावेळी मसापच्या नांदेड शाखेचे अध्यक्ष बालाजी इबितदार, योगगुरु सीताराम सोनटक्के गुरुजी, निळकंठ पाचंगे, स्वामी रामानंद तीर्थ प्राथमिक शाळेच्या अध्यक्षा अनिता हिंगोले यांनीही आपल्या भावना व्यक्त करीत दोन्ही पत्रकारांना श्रद्धांजली अर्पण केली. याप्रसंगी रवींद्र संगनवार, विजय होकर्णे, आनंद कुलकर्णी, लक्ष्मण भवरे, नरेश दंडवते, जयवर्धन भोसीकर, पुरुषोत्तम जोशी, किरण कुलकर्णी, शरद काटकर, गौतम कदम, महेंद्र देशमुख, राजेश पाडमुख, सूर्यकांत माली पाटील, प्रकाश चितळकर, रमेश पांडे, भास्कर ढवळे आदी पत्रकार उपस्थित होते.

प्रारंभी दिवंगत पत्रकार गणेश कस्तुरे आणि प्रदीप वाकोडीकर यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करण्यात आले, तर शोकसभेच्या शेवटी सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

रब्बी हंगाम २०२६-२७ साठी पीक विम्याचे पोर्टल सुरू

मुदखेड (प्रतिनिधी)– प्रधानमंत्री पीक विमा योजना रब्बी हंगाम २०२६-२७ करिता शेतकऱ्यांनी सहभागी होण्यासाठी पीक विमा पोर्टल सुरू झाले आहे.

विमा योजनेत सहभागी होण्यासाठी हरभरा व गहू (बागायत) पिकासाठी १५ डिसेंबर २०२६ ही अंतिम मुदत आहे. गहू बागायत पिकासाठी विमा संरक्षित रक्कम प्रती हेक्टरी ४५००० रुपये असून, शेतकरी हिस्सा ६७५ रुपये प्रति हेक्टर आहे. हरभरा पिकासाठी विमा संरक्षित रक्कम ३६००० रुपये प्रति हेक्टर असून, ४६८ रुपये प्रति हेक्टर शेतकरी हिस्सा आहे. या योजनेमध्ये सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांना ओळखपत्र क्रमांक असणे अनिवार्य आहे. पीक विमा नुकसान भरपाईसाठी ई-पीक पाहणी अंतर्गत पिकांची नोंद करणे बंधनकारक राहील.

योजनेमध्ये कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना सहभागी होणे ऐच्छिक आहे. या योजनेत मृत शेतकऱ्यांच्या नावे किंवा इतर अवैध मार्गाने विमा काढला गेल्यास तो अर्ज रद्द करण्यात येईल, असे संबंधितांकडून कळविण्यात आले आहे.

लोहा-कंधार मतदारसंघात २६ कोटी ४३ लक्ष रुपयांच्या कामांचे आज भूमिपूजन

○ माजी आ. ईश्वरराव भोसीकर यांच्या हस्ते भूमिपूजन ○ गोदाकाठच्या तीन गावांसाठी १२ कोटी ○ कंधार शहरात ४ कोटींची कामे





लोहा (प्रतिनिधी)– लोहा तालुक्यातील गोदाकाठच्या पेनूर, अंतेश्वर, भारसवाडा या गावात अंतर्गत सिमेंट रस्त्यांसाठी १२ कोटी, कंधार शहरासाठी ४ कोटी व रस्त्यासाठी १० कोटी ८५ लक्ष रुपये असे एकूण २६ कोटी ४३ लक्ष रुपयांचा निधी विधीमंडळ उपविधान समितीचे अध्यक्ष आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आपल्या मतदार संघासाठी आणला आहे. त्या कामाचा शुभारंभ मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर रोजी जेष्ठ नेते माजी आमदार ईश्वरराव भोसीकर यांच्या हस्ते होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर राहणार आहेत.

लोहा - कंधार भागाच्या विकासासाठी निवडणूक काळात जी जी आश्वासने दिली होती त्याची पूर्तता केली जात आहे. आ. प्रतापराव पाटील यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याशी असलेले संबंध तसेच प्रशासनावरील पकड पाहता लोकांच्या त्यांच्याकडून अपेक्षा वाढत्या आहेत. मतदारसंघातील रस्त्यासाठी त्यांनी २६ कोटी ४३ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करून घेतला आहे. त्या कामाचा शुभारंभ अंतेश्वर, भारसवाडा, पेनूर, घोडज, महाराणा प्रताप चौक, म. बसवेश्वर पुतळा कंधार येथे हे भूमिपूजन होणार आहे.

गोदाकाठच्या तीन गावांसाठी १२ कोटी –लोहा तालुक्यातील पेनूर, अंतेश्वर, भारसवाडा ही तीन गावे गोदाकाठी वसली आहेत. या तिन्ही गावात अंतर्गत सिमेंट रस्ते व बंदिस्त नाली बांधकाम केले जाणार आहे. पेनूर ४ कोटी ९९ लक्ष, अंबेश्वर ३ कोटी ९९ लक्ष, भारसवाडा २ कोटी ९९ लक्ष अशी एकूण ११ कोटी ९७ लक्ष रुपयांच्या कामाचा शुभारंभ होणार आहे.

कंधार शहरातील महाराणा प्रताप चौक ते गुलाबवाडी म. बसवेश्वर महाराज पुतळा तसेच उपजिल्हा रुग्णालय ते शहरापर्यंत चौपदरीकरण यासाठी ४ कोटींची तरतूद केली आहे. त्यामुळे कंधार शहरात येणारे रस्ते आता प्रशस्त होणार आहेत. कंधार तालुक्यातील रस्त्यांसाठी १० कोटी ८५ लक्ष रुपये मंजूर झाले आहेत.

तालुक्यातील कंधार-अहमदपूर-घोडज-कुरुळा रस्त्यासाठी १ कोटी ८५ लक्ष, फुलवळ-दिग्रस-जळकोट ४ कोटी तर कंधार-पानभोसी ५ कोटी रुपयांच्या निधीची कामे होणार आहेत.

या कार्यक्रमासाठी प्रवीण पाटील चिखलीकर, प्रणिताताई देवरे चिखलीकर, नगराध्यक्ष शरद पवार, नगराध्यक्ष शहाजी नळगे, ॲड .मुक्तेश्वर धोंडगे, आनंदराव पाटील, खुशाल पाटील पांगरीकर, केशवराव मुकदम, संजय पाटील कऱ्हाळे, करिम शेख, बाळासाहेब कऱ्हाळे, मन्नान चौधरी, जफारोद्दीन संजय देशमुख, स्वप्नील लुंगारे, अनुसया केंद्रे, भास्कर पवार, किशनराव डफडे, ॲड. बी. के. पांचाळ, भगवान राठोड, छत्रपती स्वामी, मनोहर भोसीकर, गंगाप्रसाद यन्नावार, चित्राताई लुंगारे, प्राचार्य राजेंद्र भोसीकर, दता वाले विलास नरवटे, तहसीलदार परळीकर, तहसीलदार गोरे, कार्यकारी अभियंता रामकृष्ण गळधर, बीडीओ मांजरमकर, बीडीओ महेश पाटील, सा. बां. उपअभियंता सुमित पाटील, सचिन आयतलवाड, बाबाराव गवते, गुरुअप्पा धोंडे, ज्ञानेश्वर गवते आदी उपस्थित राहणार आहेत.

श्री गुरुनानक देवजी महाराज जयंतीनिमित्त हजूर साहिब नांदेड ते बिदर दरम्यान २३ व २५ नोव्हेंबर विशेष रेल्वे

नांदेड (प्रतिनिधी)– श्री गुरुनानक देवजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त बिदर येथे आयोजित धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रवास करणाऱ्या भाविकांची तसेच इतर प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागामार्फत हजूर साहिब नांदेड ते बिदर दरम्यान विशेष रेल्वे चालविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या विशेष रेल्वेमुळे हजूर साहिब नांदेड आणि बिदर या दोन महत्त्वाच्या धार्मिक स्थळांदरम्यान प्रवास करणाऱ्या भाविकांना तसेच मार्गावरील इतर प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. वाढीव प्रवासी गर्दीचे नियोजन करण्यासाठी आणि प्रवाशांना सुरक्षित व सोयीस्कर प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ही विशेष रेल्वे चालविण्यात येणार आहे.

विशेष रेल्वेचे वेळापत्रक : १. गाडी क्रमांक ०७६१५ हजूर साहिब नांदेड ते बिदर विशेष दिनांक : २३ नोव्हेंबर २०२६ (सोमवार); हजूर साहिब नांदेड येथून प्रस्थान : ०८:३० वाजता. बिदर येथे आगमन : १६:३० वाजता; २. गाडी क्रमांक ०७६१६ बिदर ते हजूर साहिब नांदेड विशेष दिनांक : २५ नोव्हेंबर २०२६ (बुधवार). बिदर येथून प्रस्थान : १५:३० वाजता. हजूर साहिब नांदेड येथे आगमन : २३:३० वाजता.

या विशेष रेल्वेला एकूण २१ डबे जोडण्यात येणार असून, त्यामध्ये ३ एसी चेअर कार, ५ एसी ३-टियर, ७ स्लीपर क्लास, ४ जनरल डबे आणि २ सेकंड क्लास लगेज-कम-ब्रेक व्हॅन यांचा समावेश आहे.

या रेल्वेला विशेष भाडे लागू राहणार असून नियमित भाड्याच्या १.३ पट दराने भाडे आकारण्यात येणार आहे.

दक्षिण मध्य रेल्वे प्रवाशांना सुरक्षित, आरामदायी आणि सोयीस्कर प्रवास सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सदैव कटिबद्ध आहे. सण, उत्सव आणि महत्त्वाच्या धार्मिक प्रसंगी प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतात.

नांदेड-पटना विशेष रेल्वेगाडीची एक फेरी

नांदेड (प्रतिनिधी)– दिवाळी आणि छठपूजेच्या सणादरम्यान प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी दक्षिण मध्य रेल्वेने नांदेड ते पटना दरम्यान एकेरी विशेष रेल्वेगाडी चालविण्याचा निर्णय घेतला आहे. ट्रेन ऑन डिमांड अंतर्गत ०७६११ या क्रमांकाने ही विशेष गाडी चालविण्यात येणार आहे.

गाडी क्र. ०७६११ नांदेड-पटना विशेष ही गाडी बुधवार, दि. १८ नोव्हेंबर २०२६ रोजी नांदेड येथून रात्री २१:१५ वाजता सुटून पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशीम, अकोला, मलकापूर, खांडवा, इटारसी, जबलपूर, कटनी, सतना, माणिकपूर, प्रयागराज छीवकी, दिन दयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर, आरा आणि दानापूर मार्गे पटना येथे शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ८ :३० वाजता पोहचेल.

कायदेशीर कर्जवसुलीला ॲट्रॉसिटी गुन्ह्याचे स्वरूप देता येणार नाही; सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

नांदेड (प्रतिनिधी)– बँकांनी दिलेल्या कर्जाची वसुली करण्यासाठी बँक अधिकारी कायदेशीर प्रक्रिया राबवत असतील, तर केवळ त्या कारवाईच्या आधारावर त्यांच्याविरुद्ध अनुसूचित जाती- जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा अर्थात ॲट्रॉसिटी ॲक्ट (SC/ST Prevention of trocities ct) अंतर्गत फौजदारी कारवाई करता येणार नाही, असा अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या निर्णयामुळे देशभरातील बँकिंग क्षेत्रातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे. बी. पार्डीवाला आणि के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने Chavan Dharmendar Others Vs. State of Telangana Others या प्रकरणात दि. १२ ऑक्टोबर २०२६ रोजी हा निर्णय दिला. या प्रकरणातील बँक



अधिकाऱ्यांविरुद्ध दाखल करण्यात आलेली फौजदारी कार्यवाही न्यायालयाने रद्द केली.

या प्रकरणात स्टेट बँक ऑफ इंडियाने Hritasha Infra Projects Private Limited या लघुउद्योगाला २०१० पासून कर्ज सुविधा उपलब्ध करून दिली होती. आर्थिक अडचणींमुळे कंपनीचे कर्जखाते २०१६ मध्ये NP झाले. त्यानंतर कंपनीच्या संचालकांनी बँकेकडून पुनर्वसन पॅकेज न मिळाल्याचा, RBI च्या मार्गदर्शक सूचनांचे पालन न केल्याचा तसेच जातीय भेदभाव झाल्याचा आरोप करून बँक अधिकाऱ्यांविरुद्ध ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या आधारे बँक अधिकाऱ्यांना फौजदारी खटल्याला सामोरे जावे लागण्याची परिस्थिती निर्माण झाली होती.

सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात पुढील महत्त्वाची निरीक्षणे नोंदविली आहेत - १. केवळ कर्जखाते NP झाले किंवा बँकेने कर्जवसुलीची प्रक्रिया सुरू केली म्हणून बँक अधिकाऱ्यांविरुद्ध ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत फौजदारी कारवाई करता येणार नाही. २. संबंधित अधिकाऱ्यांनी तक्रारदारांच्या जातीच्या आधारावर अपमानित केले किंवा भेदभाव केला, असा विशिष्ट आरोप असणे आवश्यक आहे.

सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय बँकिंग क्षेत्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढविणारा आणि बँकिंग शिस्त व आर्थिक उत्तरदायित्व अधिक सक्षम करणारा ठरेल, अशी अपेक्षा आहे.

वामननगरमध्ये भरदिवसा घरफोडी; १ लाख २३ हजारांचे सोने-चांदी व रोख लंपास

नांदेड (प्रतिनिधी)– शहराच्या वामननगर परिसरातील एका घरात अज्ञात चोरांनी कुलूप-कोंडा तोडून आत प्रवेश करून घरातील कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने व नगदी असा एकूण १ लाख २३ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे.

दि. ६ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता ते दि. १४ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी १९.१५ वाजताचे दरम्यान वामननगर, नांदेड येथे ही घरफोडी झाली.

याप्रकरणी अमोल अनंतराव हाळे (वय ३७ वर्षे, रा. वामन नगर, नांदेड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भाग्यनगर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ६७५/२०२६, कलम ३३१(३)(४), ३०५ भारतीय न्याय संहिता- २०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोउपनि जहागिरदार करत आहेत.



किनवट – येथील ज्येष्ठ पत्रकार प्रदीप वाकोडीकर यांचे सोमवार, दि. ९ नोव्हेंबर रोजी अपघाती निधन झाले. त्यांच्या स्मृतींना उजाळा देत आदरांजली वाहण्यासाठी स्थानिक पत्रकारांच्या वतीने सोमवारी सकाळी श्री साईबाबा मंदिर मंगल कार्यालयात शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाजप नेते सुधाकर भोयर, प्राचार्य डॉ. मार्तंड कुलकर्णी, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, राष्ट्रवादीचे नेते वैजनाथ करपुडे पाटील, जयवंत वानोळे, ज्येष्ठ पत्रकार के. मूर्ती यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, स्थानिक व परिसरातील पत्रकार उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी प्रदीप वाकोडीकर यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या पत्रकारितेतील योगदानाचे स्मरण केले. त्यांच्या अकाली निधनाने पत्रकारिता क्षेत्राची मोठी हानी झाल्याची भावना व्यक्त करून सर्वांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

अवैध धंद्यांविरुद्ध पोलिसांकडून पंधरवड्यात ५९३ गुन्हे, ९०६ आरोपींवर कारवाई; ९ कोटी ८२ लाखांचा मुद्देमाल जप्त

नांदेड (प्रतिनिधी)– दि. १ ते ३० नोव्हेंबर दरम्यान पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड परिक्षेत्रात गुटखा, मटका-जुगार, अवैध दारू विक्री, शस्त्र अधिनियम व इतर कलमांन्वये अवैध व्यवसाय निर्मूलन मोहीम - ५ राबविण्यात येत आहे.

सदर मोहिमेअंतर्गत दि. १ ते १५ नोव्हेंबर, २०२६ दरम्यान संपलेल्या पंधरवड्यात नांदेड परिक्षेत्रात एकूण ५९३ कारवाया करून ९०६ इसमांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात आरोपींकडून ९ कोटी ८२ लाख ८१ हजार ३७९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर कारवाईत पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयातील विशेष पथकाने परभणी जिल्ह्यात जिंतूर येथे केलेली वाळूविरुद्धची कारवाई व लातूर जिल्ह्यातील चाकूर पोलीस ठाणे हद्दीत केलेल्या चंदनाविरुद्धच्या कारवाईचा समावेश आहे.

उस्मानशाही मीलच्या पुनर्जीवनासाठी प्रत्येक वार्डात स्वाक्षरी मोहीम; जागरण सप्ताहाला उत्स्फूर्त प्रतिसाद

नांदेड (प्रतिनिधी)– उस्मानशाही मीलचे पुनर्जीवन करण्यात यावे, या मागणीसाठी सुरू असलेल्या जागरण सप्ताहाच्या दुसऱ्या दिवशी शहरातील विविध वार्डांमध्ये स्वाक्षरी मोहीम राबवण्यात आली. नागरिकांनी या मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

नांदेड शहराच्या औद्योगिक इतिहासात महत्त्वाचे स्थान असलेल्या उस्मानशाही मीलला पुन्हा सुरू करावे, हजारो कामगारांना रोजगार मिळावा आणि शहराच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळावी, यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. सप्ताहाच्या दुसऱ्या दिवशी ललिता कुंभार, डॉ. किरण चिद्रावार, रोहन कहाळेकर, दीपक सातोरे, सुभाष लोखंडे, सुमेध वाघमारे, शेख अन्सार, शेख फारूक शेख बाबू, कमळ गवळी यांच्या पुढाकारात विविध भागांत स्वाक्षरी मोहीम राबवण्यात आली. ठिकठिकाणी नागरिकांनी स्वाक्षऱ्या करून मील पुनर्जीवनाच्या मागणीला पाठिंबा दर्शवला. या मोहिमेत वंचित बहुजन आघाडीचे नगरसेवक प्रतिनिधी राक्षसमारे, नगरसेवक सत्यपाल सावंत, नगरसेवक मुन्ना अब्बास यांच्यासमवेत काँग्रेसच्या नेत्या डॉ. रेखा चव्हाण, जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, काकासाहेब डावरे व उस्मानशाही मील संवर्धन समितीचे समन्वयक श्याम निलंगेकर यांनी सहभाग घेतला.

मील सुरू झाल्यास केवळ कामगारांचेच नव्हे, तर नांदेड शहरातील व्यापारी, शेतकरी आणि तरुणांना देखील मोठा फायदा होणार असल्याचे यावेळी कार्यकर्त्यांनी सांगितले. शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन मील पुनर्जीवनासाठी ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. जागरण सप्ताहात यापुढेही प्रत्येक वार्डात स्वाक्षरी मोहीम, जनजागृती आणि विविध कार्यक्रम राबवण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

नायगावमध्ये अल्पवयीन मुलीवर अत्याचार, ७ महिन्यांची गर्भधारणा उघड; आरोपीला अटक, ४ दिवसांची पोलीस कोठडी

नांदेड (प्रतिनिधी)– माणुसकीला काळिमा फासणारी आणि समाजमन सुन्न करणारी संतापजनक घटना नायगाव तालुक्यातील एका गावात उघडकीस आली आहे. एका २६ वर्षीय तरुणाने अल्पवयीन मुलीवर तब्बल सात महिन्यांपासून लैंगिक अत्याचार केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

पीडित मुलीच्या पोटात दुखत असल्याने तिला रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. तेथे वैद्यकीय तपासणी केली असता ती सात महिन्यांची गर्भवती असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आणि या अमानुष कृत्याचा पर्दाफाश झाला. या घटनेने संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सातेगाव येथील दीपक बाबुराव जाधव (वय २६) याने एका अल्पवयीन मुलीवर मागील सात महिन्यांपासून अत्याचार केला. मुलीने पोटदुखीची तक्रार केल्यानंतर वैद्यकीय तपासणीत गर्भधारणेचा प्रकार उघड झाला.

या धक्कादायक घटनेप्रकरणी पीडितेच्या वडिलांनी तातडीने कुंटूर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. घटनेचे गांभीर्य ओळखून कुंटूर पोलिसांनी दि. ८ नोव्हेंबर २०२६ रोजी गुन्हा दाखल केला. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत दि. ११ नोव्हेंबर रोजी आरोपीला अटक केली. ज्या वयात मुलीने शिक्षण, स्वप्ने आणि भविष्याची स्वप्ने पाहायची, त्या वयात तिच्यावर असे संकट कोसळणे ही समाजासाठी लाजिरवाणी बाब आहे. महिला आणि बालिकांच्या सुरक्षिततेबाबत मोठमोठ्या घोषणा केल्या जात असताना अशा घटना घडणे ही गंभीर चिंतेची बाब आहे.

या प्रकरणातील आरोपीला कायद्याच्या चौकटीत कठोरात कठोर शिक्षा मिळाली पाहिजे, अशा संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करण्यात येत असून, पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी तपासात कोणतीही कसूर होऊ नये, पुरावे वेळेत गोळा करून दोषारोपपत्र दाखल करणे आणि खटल्याचा जलदगतीने निकाल लावणे आवश्यक आहे. दरम्यान, न्यायालयाने आरोपीला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल भोसले यांनी दिली.

Godateer Samachar हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com